परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

अंक ९९ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ सप्टेंबर २०१४

वेबसाईट : www.marathepratishthan.org ✦ ई-मेल : maratheparivar@yahoo.co.in

(फक्त खाजगी वितरणासाठी)

|| श्री ||

|| वंदे मातरम ||

संपादकीय,

प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार, वाढता उन्हाळा, लांबणारा हिवाळा आणि हुलकावण्या देणारा पावसाळा या रुपाने पर्यावरणाची हानी आपण सर्वांनी अनुभवली. पावसाची वाट पाहून पाहून तोंडचे पाणी पळाले. तृषार्त धरणीला शांत करणारा मृगनक्षत्राचा पाऊस बरसलाच नाही. जून महिना कोरडाच गेला. पाणीकपात, शेतकरी चिंतेत, गुरांना चारा कसा मिळणार, महागाईने त्रस्त पण देवाजीला करुणा आली आणि वरुणराजा प्रसन्न झाला आणि पाऊस बरसला.

वर्षा ऋतू हा सृजनपर्व सुरु करणारा ऋतू. आकाश आणि धरतीच्या मीलनात ढग हे प्रेमदूत बनून येतात. मेघांचा अर्थ वर्षाव करणे जलधर, पयोधर आणि वारीवाह यांची तीन रुप कालीदासाने वर्षाऋतुच वर्णन जलदसमय असे केले आहे. इंद्रधुनुष्यातून चराचराच्या सौदर्याचा वेध घेणारा हा ऋतू जलबिंदूतून सूर्यप्रकाशाच्या सप्तरंगाचे अभिनव दर्शन देणारा.

पाणी म्हणजे जीवन, जीवनाचे दुसरं नाव संघर्ष आहे. जसं दुःखाशीवाय सुखाला महत्व नाही तसं संघर्षाशिवाय जीवन नाही तरच त्या जीवनात अर्थ असतो. अन्यथा ते साचलेल्या डबक्यासारखं होऊन जातं सृष्टी आपल्याला हे प्रत्येक ऋतूत हरघडी शिकवित असते. वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर या सहाऋतूत ते आपल्याला अनुभवता येतं मात्र त्यात समरस होता आलं पाहिजे. या ठिकाणी कविता आठवते ती अशी

वैशाखमासी प्रतिवर्षी येती,<br>
आकाशमार्गे नव मेघ पंक्ती ।<br>
नेमेची येतो मग पावसाळा ।<br>
हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा ।

निसर्ग हा माणसाचा सर्वात मोठा गुरु आहे. मानवाला आवश्यक असे पाऊसपाणी, धनधान्य किंवा अन्य गोष्टी देणारी सृष्टी म्हणजेच निसर्ग, यांच्या नियमितपणाचे मनोमन कौतुक करुन त्याच्याशी सर्वांनी कृतज्ञ राहावे. पंचमहाभूतांना नमस्कार करावा. असो.

पुढचा अंक १०० वा डिसेंबर मधे प्रकाशित होणार आहे. आपल्या पूर्वजांनी शतायू भव असे आशीर्वाद दिल्यामुळेच याचि देही, याचि डोळा शंभरावा अंक पाहण्याचे भाग्य आपल्याला मिळणार आहे. शंभरावा अंकाचे प्रकाशन दि. १२ डिसेंबर ला वनिता समाज हॉल, दादर येथे सकाळी ११वा. होणार आहे. तरी सर्वांनी अगत्याने यावे. १०० व्या अंकासाठी साहित्य पाठविण्याची अंतिम दिनांक २० ऑक्टोबर २०१४ ठरला आहे. त्याच्या आत संपादिकेच्या पत्यावर साहित्य पाठवावे. या शंभराव्या विशेषांकात आपल्या मराठे परिवारातील कलाकार, कलावंत, मंडळी त्यात गायक, वादक, नट, अभिनय, नृत्य यात पारंगत असलेली तसेच खेळाडू, साहित्यिक, लेखक, विद्वान, वक्ता, ऊद्योगात आघाडीवर असलेले ऊद्योजक या सर्व कुलबांधवांची यादी हितगुज मध्ये प्रकाशित करण्याची इच्छा आहे तरी आपले नांव, पत्ता, दूरध्वनी, आपल्या कार्याची थोडक्यात ओळख असे लिहून संपादिकेच्या पत्यावर पाठवावे. यासाठी आपल्या कुलबांधवांचे सहकार्य अपेक्षित आहे. शंभराव्या अंकासाठी जाहिराती, देणग्या भरघोस देऊन मराठे प्रतिष्ठानला बळकट करावे ही विनंती करीत आहे.

आपली शुभचिंतक,

डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०) ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१. फोन : २४१५०८८९ (दि. १३/८/१४)

## जाहीर निमंत्रण

## हितगुजचा शंभरावा अंक प्रकाशन समारंभ

रविवार दि. १४ डिसेंबर २०१४ ला सकाळी १० वा. वनिता समाज हॉल, शिवाजी पार्क, दादर, मुंबई, येथे हितगुजच्या शंभराव्या अंकाचे प्रकाशन विख्यात कवी, गायक, संगीतकार श्री. यशवंत देव यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. तसेच या कार्यक्रमात श्री. भाऊ मराठे हे विख्यात सतारवादक पं. शंकर अभ्यंकर यांची मुलाखत घेणार आहेत.

सर्व कुलबांधवांनी या कार्यक्रमाला ऊपस्थित राहून समारंभाची शोभा वाढवावी ही विनंती.

अक्षर जुळणी व छपाई : निर्मिती आर्टस - ९३२३३९१२६०

Marathe Pratishthan

## संवाद - कुलबांधवांशी

नमस्कार कुलबांधव आणि भगिनींनो,

आपल्या संवादाला आपला प्रतिसाद हळू हळू मिळू लागला आहे, त्यामुळे मला हुरुप आला आहे, नवनवीन कल्पना सुचत आहेत पावसाळी हवेत कामाचा हुरुप वाढला आहे.

जूनचा अंक वाचल्यावर लगेच अंत आणि संवाद आवडल्याचा दूरध्वनी पुण्याहून श्री. वा. ग. मराठे (म.प्र.चे संस्थापक) यांचा आला, फार आनंद झाला. दूरध्वनीवर खूप संवाद झाला. यामुळे आपले म्हणणे कुणालातरी आवडते यामुळे छान वाटले.

कुलबांधव आणि भगिनींनो, मागील काही अंकामधून मी असे आवाहन केले होते की आपल्या विभागातील, गावातील व जवळपासच्या परिसरातील मराठे कुलबांधवांशी आपण संपर्क वाढवा. छोटे-छोटे मेळावे घ्या आणि त्याची माहीती आपल्या हितगुज मध्ये छापण्यासाठी पाठवा. तसेच आपल्या कुटुंबातील व्यक्तींनी मिळवलेले यश, तसेच कुटुंबातील लग्नकार्ये या बद्दलची माहिती अवश्य कळवा. हितगुजमध्ये प्रकाशित केली जाईल.

आपल्या कुलबांधवांपैकी काहिंना शैक्षणिक मदत हवी असल्यास अथवा कोणाला वैद्यकिय मदत हवी असल्यास अवश्य अर्ज करावा. आपल्याकडे असलेल्या फंडामधून शक्य होईल तेवढी मदत नक्की केली जाईल.

आपल्या कुलबांधवांपैकी दानशुर व्यक्तींना आवाहन करीत आहोत की, आपल्या शैक्षणिक मदत व वैद्यकीय मदत फंडासाठी आपण शक्य होईल तेवढी मदत करा. कारण शैक्षणिकमदत आणि वैद्यकिय मदत फंडासाठी आपण शक्य होईल तेवढी मदत करा. तर त्यामधून आपण जास्त मदत देऊ शकतो.

आपल्या मराठे प्रतिष्ठान कडून ज्या विद्यार्थ्यांनी या अगोदर शैक्षणिक मदत घेतली असेल व आता ते आपल्या नोकरी धंद्यामध्ये स्थिरस्थावर झाले असतील त्यांनी आपली सामाजिक जाणीव म्हणून शक्य असेल तेवढी मदत आपले दोन्ही फंडाला अवश्य करावी. जेणेकरुन इतरांना आपण त्यातून मदत करु शकु.

आपल्या कुलबांधव आणि भगिनींचा एकमेकांशी संपर्क वाढावा यासाठी मला असे सुचले आहे की, मराठे प्रतिष्ठान फक्त मुंबई, पुण्यामध्ये न रहाता छोटी छोटी शहरे तसेच गावांमध्ये पोहोचले पाहिजे. त्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी ज्यांना स्वतःहून म. प्र. च्या कार्यासाठी वेळ द्यायचा असेल त्यांना प्रतिनिधी म्हणून काम करता येईल. त्या त्या विभागातील कुलबांधवांशी संपर्कात रहाता येईल, त्यामुळे मराठे प्रतिष्ठानचे कार्य सुलभपणे वाढविता येईल. इच्छुकांनी जरुर संपर्क साधावा. समाजकार्याची आवड असणाऱ्या कोणत्याही वयोगटातील स्त्री पुरुषांनी स्वखुशीने यावे आणि आपले मराठे प्रतिष्ठान वाढण्यास हातभार लावावा. अच्छा! आता आपली रजा घेतो. पुन्हा भेट शतकमहोत्सवी अंकात.

हेमंत अरुण मराठे (पृ.२१)
कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान
९२२०६९९९५७

### मराठे प्रतिष्ठानच्या हितगुजचा शंभरावा अंक

मराठे कुलबांधवांचे (यात खांबेटे, विद्वांस, चक्रदेव यांचाही समावेश आहे) मराठे प्रतिष्ठान हे मुंबई येथे कार्यरत आहे. प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाची मासिक सभा दर महिन्यात नियमीतपणे प्रसिद्ध होते त्याचे देखणे स्वरुप, छपाई व आतीस विविध मजकूर बघता अशा प्रकारचे मुखपत्र अन्य कोणा परिवारातर्फे प्रसिद्ध होत आसेल असे वाटत नाही.

सदर हितगुजचा शंभरावा अंक येत्या डिसेंबर २०१४ मध्ये प्रसिद्ध होणार आहे. तो अंक कसा असावा त्याचे स्वरुप कसे असावे, कोणत्याही साहित्याला प्राधान्य द्यावे या बद्दल वाचकांच्या कडून सूचना मागविण्यात आल्या असून ज्यांच्या सूचना चांगल्या ठरतील त्यांना पारितोषके देण्याचे प्रतिष्ठानने ठरविले आहे. आता पर्यंतच्या अनुभवावरुन हा शंभरावा अंक चांगलाच निघेल या बद्दल खात्री आहे. तरी हितगुजच्या वाचकांनी आपल्या सूचना संपादकांकडे पाठवाव्यात असे निवेदन हितगुजतर्फे करण्यात आले आहे.

तसेच ज्या सभासदांनी हितगुज आजीवन सभासद वर्गणी रु. २००० अद्याप पाठविली नसेल त्यांनी ती मराठे प्रतिष्ठान या नावाने चेकने संपादक हितगुज ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१. या पत्त्यावर पाठवावी अशी विनंती प्रतिष्ठान तर्फे करण्यात आली आहे.

Marathe Pratishthan

# माझ्या जीवनाच्या अंतिम क्षणी

एका वृद्ध पित्याने त्याच्या वयस्क मुलाला लिहिलेले पत्र इंटरनेटवर वाचायला मिळाले. एक काल्पनिक पण कठोर वास्तविकतेचे चित्र दर्शविणारे हृदयद्रावी असे हे पत्र सद्य परिस्थिती व समाजातील वर्तमान कुटुंबव्यवस्था ह्याची स्पष्ट कल्पना देणारे आहे. पत्राचा मजकुर ह्या प्रमाणे आहे :-

माझ्या प्रिय मुला, मी वृद्ध झालो आहे त्यामुळे तू मला समजून घेशील अशी आशा बाळगतो. पत्र समजून घेवून माझ्याकरीता धीर धरण्याचा प्रयत्न कर. माझे डोळे आता क्षीण झाले आहेत त्यामुळे माझ्या हातून कधी एखादी वस्तू तुटली, फुटली किंवा सूप पिताना कधी ते टेबलावर सांडले तर माझ्यावर रागावू नकोस किंवा रागाने आरडा-ओरडा करु नकोस. म्हातारा माणूस खूप संवेदनशील होतो त्यामुळे त्याच्यावर ओरडले तर तो आत्मग्लानीने हळवा होतो. हल्ली माझे कानही मला सहकार देत नाहीत त्यामुळे तुझे बोलणे मी नीट ऐकू शकत नाही तेव्हा मला बहिरट म्हणून संबोधू नको, तू मला समजेल अशा रीतीने पुन्हा ती गोष्ट मला सांगत जा किंवा पाटीवर लिहून दाखव. मी खरोखर दिलगीर आहे. हल्ली माझे गुडघे कमजोर झाले आहेत. पट्कन उठू -बसु शकत नाही. तेव्हा मला आधार देवून मदत कर. तुला आठवत असेल तु लहान होता तेव्हा तुला सरळ चालता येत नव्हते त्यावेळी मा तुझ्या बरोबर वाकून हळूहळू चालून तुझ्या बरोबर राहून तुला चालायला शिकविले. मी जर माझी एकच गोष्ट पुनः पुन्हा सांगू लागलो तर तू कंटाळू नकोस. तू लहान असताना फुग्यासाठी ध्यास धरायचा आणि तुला हवा तो फुगा मिळाला नाही तर तू त्यासाठी पुनः पुन्हा मला रडत रडत सांगत असे त्याच गोष्टीचे हट्ट करीत असे. शरीर क्षीणतेने मला सर्दी - खोकला वारंवार होतो. अशावेळी माझ्या खोकल्यामुळे चिडू नको. काही वेळा अशक्ततेमुळे स्नान न केले व तुला ते अस्वच्छ वाटले तर ते तू सहन कर. मी नियमीत आंघोळ करावी त्याचा आग्रह धरु नकोस माझ्यावर चिडू नकोस, तुझ्या लहानपणी तुला आंघोळ करायची नसायची तेव्हा तू घरभर फिरत असे त्यावेळी तुझ्यामागे धावून तुला उचलुन घेवून न्हाणीघरात नेत असे. मी घुमी झालो असे वाटले तरी ते सहन कर. वृद्धांचे या वयात घुमी होणे क्रमप्राप्त असते. थोडा जरी वेळ माझ्या करीता काढलास, माझ्या जवळ बसून गोष्टी केल्यास तरी मला बर वाटेल तू तुझ्या कामात व्यस्त असतोस पण तरीही माझी तशी अपेक्षा असणही गैर नाही. माझ्या गोष्टींमध्ये तुला स्वारस्य नाही वाटले तरी योग्य वेळ दिलास तर मला आनंदच होईल, कारण संबंध दिवस माझ्या खाटेवर मी एकटाच असतो तेव्हा माझ्याशी बोलायला कुणी व्यक्ति मजजवळ नसते त्यामुळे दिवस पसार करणे खूप कठीण जाते. तुझ्या लहानपणी माझ्याजवळ येवून तुझ्या टेडीबियरच्या गोष्टी खूप आनंदाने सांगत असे व मी तुझ्याशी एकरुप होवून ऐकत असे. दिवसें दिवस माझी प्रकृति खालावत चालली आहे. आंथरुण सोडणे अशक्य वाटते अशावेळी कधी आंथरुण बिघडले तर ते सहन करुन माझ्याकडे लक्ष दे. खरं सांगायचं तर आता मी फार दिवसाचा सोबती नाही, तू धीर धरुन अंतीम क्षणी माझ्या जवळपास रहा. अंतीम क्षणी माझा हात धरुन मृत्युचा सामना करायला तू मला मदत करशील ना?

सदाशिव बळवंत मराठे (पृ. ३८०)
अन्नपूर्णा शास्त्री पोळ,
कोठीचा रस्ता, बडोदे - ३९०००१,
दूरध्वनी ०२६५/२४२३०५५ / २४२८६१८

## हितगुज वर्गणीदार - देणगीदारांची नांवे

श्री. अरुण मराठे (डोंबीवली), श्री. मनोज मराठे (डोंबीवली), श्री. अनंत गणेश विद्वांस (डोंबीवली), श्री. गिरीश खांबेटे (डोंबीवली), श्री. रमाकांत माधव विद्वांस (माटुंगा), श्री. सी. गो. खांबेटे (अंधेरी), डॉ. सुरेंद्रनाथ मराठे (पुणे), श्री. अनंत सदाशीव मराठे (घाटकोपर), श्री. मोरेश्वर लक्ष्मण मराठे (सांगली), श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे (मुलुंड) (भाऊबीज देणगी), श्री. सदानंद विष्णु मराठे (बांद्रा), श्री. रविंद्र नरहर मराठे (इंदुर), श्री. चंद्रशेखर भास्कर मराठे (कॅनडा), श्रीपाद नारायण मराठे (बेळगाव) इ. सर्व देणगीदारांचे आभार! हितगुजला वर्गणी-देणगी दिलेल्या सर्व कुलबांधवांचे आभार.
अनवधाने एखादे नाव राहिले असल्यास क्षमस्व.

विशेष सूचना : हितगुज राखीव फंड निधी शक्यतो चेकद्वारे मराठे प्रतिष्ठान या नावाने संपादिकेच्या पत्त्यावर पाठवावा.
तसेच मराठे प्रतिष्ठानची सारस्वत कॉपरेटिव्ह बँक, वरळी शाखा,
अकाऊंट नंबर : ०१०२००१०००२२४४८ IFSC CODE : SRCB0000010 असा आहे.
येथे फंड निधी जमा करा. जमा केल्यास आपले नाव कळवावे.

Marathe Pratishthan

# बायकोपेक्षा मेव्हणी बरी !

ग्रंथाली कडून 'माझे मराठीतील असभ्य म्हणी वाक्प्रचार आणि संकेत' या नांवाचे पुस्तक प्रकाशित झाले. या म्हणी इ. चे भाषीक, मानसशास्त्रीय, सांस्कृतिक आणि सामाजिक पैलू यांच्यासह ते प्रकाशित झाले आहे. त्यातील मराठे मंडळींसाठी सामाजिक भागातील थोडा भाग देत आहे.

१) घरी नाही मेव्हणी आणि सासूची रांडोळी २ ) साळी छोड सासु सूं ही मरकरी (राजस्थानी) ३) घरी नाही साळी सासूशी करे टवाळी ४) ज्यास नाही साळी तो करी आईची टवाळी ५) गांव मेव्हणी (गांवातील वेश्या, अनिर्बंध वर्तनाची स्त्री) ६) साली/मेव्हणी म्हणजे अर्धी बायको. ७) साली आधी निहाली, सलहज पूरी जोय (उर्दू) ८) शाली शाळाज आधेक माग (मेव्हणी व मेव्हण्याची बायको या अर्ध्याबायकोसमान असतात.) ९) ससुरे न साहुरा साली अ रे न नींहु (सिंधी) (सासु नाही तर सासर नाही, मेव्हणी नाही तर सुख नाही) १०) टापरा जेबे करी पासीव थिब साळी (गप्पा विनोद कराल तेव्हा जवळ मेव्हणी असावी.) ११) माछ जाखरे फळी, टापरा जाकरे शाळी (ओडीआ) (मासळीत मासळी फळी आणि गप्पांना चांगली साळी. १२) सकाळ गाधुआ पखाळ खिआ दिहरे देबे जाए शाळी सांगरे कहिले जेत्रे सहे (ओडीआ) ( सकाळची आंघोळ नि पखाळ भात ज्याला सोसतो त्याने मेव्हणीशी गंमत केलेली चालते. १३) बायकोपेक्षा मेव्हणी बरी.

मेव्हणी विषयी अनेक आंबटगोड भावना वरील म्हणींमध्ये प्रगट झाल्या आहेत. त्यांचे मूळ हिंदु एकत्र कुटुंब पद्धत हें आहे. मेव्हणी बद्दलच्या या भावना हिंदु समाजात दिसून येतात. मुस्लीम आणि ख्रिस्ती समाजात दिसून येत नाहीत. हिंदु एकत्र कुटुंबात सख्खी भाऊ-बहिण, आत्तेभाऊ-बहिण, मामेभाऊ-बहिण, मावसभाऊ-बहिण, आणि पुढे चुलत/मावस भाऊ-बहिण अशी अनेक पसरत जाणारी नाती आहेत. कित्येकदा मामा-भाचवंडे, काका-पुतणे ही वयाने बरोबरीची किंवा थोडें अंतर असलेली असत. मात्र या पैकीं एकहि नातेसंबंध विवाहयोग्य मानला जात नाही. या नात्यांमध्ये विवाह होणें निषिध्दच नव्हे, तर पाप मानले आहे.

आता मुस्लीम कुटंब पहा. गोवळकोंड्याचा कुतुबशाह मुहुम्मद कुळी याला ए क मुलगी होती. पण मुलगा नव्हता. त्याने आपल्या सख्ख्या पुतण्याला दत्तक घेतलें व पुढे हा दत्तकपुत्र वयांत येताच त्याचे आपल्या मुलीशी लग्न लावून दिले. ही घटना हिंदुकुटुंबात शक्य आहे का? मुस्लीम समाजांत चुलत भावंडांचे विवाह सर्रास होतात. इतर नात्याच्या भावडांचे होण्याला धर्माची आडकाठी नाही. फक्त एकाच आई वडिलांच्या मुलांचे (सहोदरांचे) विवाह त्यांच्यांत निषिध्द आहेत. औरंगजेबाने आपल्या सख्ख्या भावंडांना ठार मारले. पण त्यांच्या मुली आपल्या सुना करुन घेतल्या !

मुसलीम समाजाप्रमाणे नातेसंबंधात विवाह घडून न येण्यांचे कारण म्हणजे हिंदु धर्मानें स्वीकारलेली सापिंड्याची कल्पना पिंड म्हणजे शरीर पूर्वजांचे हे शरीर पिढ्यान् पिढ्या त्या घराण्याच्या सर्व नातेबाईकांत उतरते या कल्पनेचा हिंदु कुटुंबातील व्यक्तिंच्य कामजीवनावर परिणाम होतो.

नैसर्गिक प्रक्रियेनुसार मुले मुली जेव्हा वयांत येऊ लागतात तेव्हा त्यांना एकमेकांविषयी आकर्षणयुक्त जिव्हाळा वाटणें स्वाभाविक आहे. एकमेकांशी गप्पा माराव्यात, एकमेकांच्या सहवासात रमावे, एकमेकांवर जीव टाकावा, परस्परांच्या सुखदुःखांनी हसावे, रडावे, एकमेकांना धीर द्यावा. वेळीप्रसंगी दोष दाखवून कानउघडणी करावी. भांडावे, रडावें, चोरट्या पण निसटत्या स्पर्शाने मोहरुन जावें, शरीरांत होणारे बदल चोरट्या नजरेने टिपावेत, हे सर्व कामवासनेचे निकोप अविष्कार आहेत ते नातेसंबधातील मुलामुलींमध्ये व्यक्त होतात आणि त्यांत गैर काही नाही. पण हे अविष्कार स्वातंत्र्य पुढे गेले तर? अगम्यगमनाचें घोर पातक घडायचें! ही भीती हिंदुकुटुंबातील कर्त्या माणसांना रास्तपणें वाटते. त्यामुळे हिंदु एकत्र कुटुंबात वयांत येणाऱ्या मुलामुलींना जाणीवपूर्वक अलग केलें जाते. ''तुम्ही आतां मोठी झालांत तुम्ही आतां एकत्र खेळणे,उठणे, बसणें योग्य नाही. तुम्हाला हें शोभत नाही. बायकांत पुरुष लांबोडा, मुलींच्या अंगाला मुलांनी हात लावायचा नाही''. ही वाक्ये सर्व हिंदु मुलामुलींच्या परिचयाची आहेत. मुंजविधीत जवळ जवळ हाच उपदेश केला जातो.

शहरांत राहणाऱ्या सुशिक्षित चौकोनी कुटुंबात जर सोळा वर्षाची मुलगी आणि अठरा वर्षाचा मुलगा असेल व आई वडिलांना कामानिमित्त बाहेरगांवी जायचें असेल तर ती मुलांना एकत्र ठेऊन जाण्याचा विचार हि करुं शकत नाहीत. त्यांच्यावर लक्ष ठेवायला कोणाला तरी घरीं ठेवून मगच ती बाहेर पडतील.

अशा प्रकारे हिंदु कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या कामवासना दडपणाखाली दबलेल्या असतात. मेव्हणीच्या बाबतीत त्या प्रकर्षाने प्रकट होतात. एकतर मेव्हणा-मेव्हणी हे नातेच विवाहानंतर निर्माण होते. त्यामुळे त्यांत निषिद्ध लैंगिक व्यवहार होण्याची भीती नसते. कारण तो व्यवहार बायकोशी अधिकृतपणे होत असतो. अशा प्रकारे मेव्हणा-मेव्हणी यांचे मुक्त वर्तन हे दोघांच्या हि दबलेल्या कामवासनेला मिळालेले मर्यादित आविष्कार स्वातंत्र्य आहे. वेश्येला गावमेव्हणी म्हणण्याचे रहस्य आता उलगडेल. मेव्हणीशी असलेले थोडे स्वैर वर्तन हे वेश्येच्या स्वैर वर्तनाशी थोंडे नाते जोडते, विशेषतः गिऱ्हाईक नसलेल्या पुरुषाशी वेश्येचे जें अघळपघळ नातें असतें त्याच्याशी! मेव्हणा मेव्हणीच्या या स्वैर वर्तनाला सामाजिक मान्यता आहे. त्यांच्या या वर्तनाकडे थोडें उदार दृष्टिनें पाहिलें जाते.

मेव्हणा मेव्हणींत जर संबंध आले तर ते निषिद्ध आहेत, पण सापिंड्य कल्पनेला धक्का लावणारे, अगम्यगमनाच्या स्वरुपाचे नाहीत. तसें संबंध आल्यामुळे मेव्हणा मेव्हणींचे कायदेशीर किंवा बेकायदेशीर विवाह झाल्याची उदाहरणे आहेत. तर काहीं जातीत बायकोला मुल होत नाही या कारणाने मेव्हणा मेव्हणीची मागणी करतो आणि ती पूर्ण होते.

या पार्श्वभूमीवर पुन्हा मुस्लीम कुटुंबसंस्थेकडे बघू तिथला तरुण आपल्या चुलतबहिणीकडे भावी वधू म्हणुन बघू शकतो. तसे बघण्याला धर्माचा निषेध नाही, म्हणून कुटुंबप्रमुखाची आडकाठी नाही आणि म्हणून त्या समाजात मेव्हणा मेव्हणींचे आंबटगोड नाते नाही. काही हिंदुसमाजामध्ये आतेमामेभावंडांचे लग्न लावण्याची पद्धत आहे. या विषयांत मी काही हिंदु मुस्लीम व्यक्तींची मुलाखत घेतली. सर्वांचे म्हणणे एकच तुम्ही नवरा-बायको आहात असें आमच्या मनांत भरवूनच दिले जात असे ! आम्हाला हि या संबधाची पूर्ण कल्पना असे. त्यामुळे हे सर्व आमच्या दृष्टीने अगदी सहज आणि रुटिनचे असे!

अश्विनीकुमार दत्तात्रेय मराठे (पृ. २७०)
६, मंजुषा, विकास हाऊसिंग सोसायटी,
शास्त्री नगर, डोंबिवली (प.)
पिन ४२१ २०२ मो. ९८५०२४१९१३

## वाचकांचा पत्र व्यवहार

माननीय संपादक, हितगुज

सप्रेम नमस्कार, हितगुज जून २०१४ चा अंक नुकताच पोस्टाद्वारे मिळाला. धनय्वाद! या आधी डिसें २०१३ चा अंक मिळाला होता. मात्र त्या आधीचे २/३ वर्षातील अंक (एखादा अपवाद सोडल्यास) मिळत नव्हते काही अडचणी असाव्यात असो.

हितगुजचा १०० वा अंक येत्या डिसेंबर मधे येणार असल्याचे वाजून अत्यंत आनंद झाला याच बरोबर हितगुजचा जन्म होण्याच्या वेळच्या आठवणी जाग्या झाल्या सुरुवातीच्या वेळी प्रतिष्ठान वृत्त माननीय भाईसाहेब (वि.गो.) मोत्यासारख्या सुंदर अक्षरात पोस्टकार्डाने पाठवायचे त्यानंतर हितगुजची कल्पना पुढे आली व माझ्या आठवणीनुसार पहिले काही अंक भाऊसाहेबांच्या हस्ताक्षरातीलच होते. मी मुंबईत असताना अशा महत्वाच्या गोष्टी जपून ठेवल्या होत्या परंतु पुण्यात सगळे सामान हलविल्यानंतर मला बऱ्याच गोष्टी (असण्याची शक्यता असली तरी) मिळेनाशा झाल्या आहेत. प्रतिष्ठानच्या कार्यालयाच अथवा आपणाकडे यांची काही पत्रे किंवा १ल्या अंकाचे मुखपृष्ठ येणाऱ्या १००व्या अंकात छापण्याची ही कल्पना योग्य वाटत असल्यास अमलात आणावी ही विनंती.

नुकत्याच मिळालेल्या जून१४ च्या अंकात श्री. भाऊ मराठेंचा कौशल्य निवेदनाचे हा लेख उत्तम असून जपून ठेवण्यासारखा आहे. या संदर्भात २०-२२ वर्षापूर्वी मराठे उद्योग भवन च्या गच्चीवर कथाकथनाचा कार्यक्रम झाला होता. त्या प्रसंगाची आठवण आली. सौ. मंजिरी, मालविका व माझी पत्नी सुलभा यांचे कथाकथन तर उत्तम होतच परंतु त्याहूनही भाऊंचे निवेदन अप्रतीम होते. त्यावेळी प्रथम भाऊंना पाहिले व त्यांचे निवेदन ऐकण्याचा योग आला. निवेदन ऐकताना समजूत झाली होती की भाऊ विद्यापीठात किंवा कॉलेजमधे मराठीचे तज्ञ प्राध्यापक असावेत परंतु ते निघाले पेंट टेक्नॉलॉजीतील पदवीधर अभ्यासू व मार्गदर्शक लेखाबद्दल त्यांचे अभिनंदन त्यांच्या ठाण्याच्या घरी मिटिंगच्या निमित्ताने जाण्याचा योग आला होता.

या मिळालेल्या अंकामुळे काही जुन्या आठवणींना उजाळा मिळाल्यामुळे खुप समाधान वाटले. येणाऱ्या १०० व्या अंकासाठी शुभेच्छा व यानिमित्त रु. १००१/- ची देणगी चेकने पाठवीत आहे. प्रतिष्ठानने योग्य वाटेल अशा कारणासाठी वापरावा. कळावे,

आपला स्नेहांकीत

डॉ. सुरेंद्रनाथ ग. मराठे (पृ. २८४)
सी-४७, सुयोग आदित्य रेसि.
पुणे - ३०. फो. (०२०)२४२३१६८६

Marathe Pratishthan

# कथा पत्र लिहिण्यास कारण की....

प्रिय मनोहर,

काय लिहू? वीस वर्षापूर्वी मी तुला एकदाच लांबलचक पत्र लिहिले होते. आठवते?

.... मला सर्व काही तपशीलासह आठवत ! त्यापत्रातही मी तुला 'प्रिय' म्हणूनच लिहिल होत. त्याच मनःस्थितीतील सुप्त भावनांमुळे आजही 'प्रिय मनोहर', अस लिहिलं !....

....पण त्या पूर्वीच्या पत्रातील पुढील शब्द.... 'खूप.... खूप प्रेमाने नमस्कार' हे मात्र, आजच्या पत्रात लिहिताच आले नाहीत!

प्रथम मन अडखळलं नंतर लेखणी थांबली! कशी सुरुवात करावी? नसलेली भावना विनाकारण शब्दबद्ध करायला मन तयार होईना!

मग, कोणते शब्द वापरावे त्यावर थोडा विचार केला. निश्चित काहीच सुचेना ! विचारांचा गोंधळ झाला. एकाएकी मनात आलं की, केवळ उपचार म्हणून काहीतरी लिहिलंच पाहिजे का?

....म्हणूनच उपचाराची रुढी सोडून वरीलप्रमाणे सुरुवात केली. तर... सरळच लिहिले.

...पत्र लिहिण्यास कारण की,.......

...पण एका वाक्यातच पत्र संपवावेसे वाटत नाही. थोडा तरी पूर्व संदर्भ तुझ्या लक्षात आणून देणं आवश्यक वाटत ! .... कारण.....

...कारण कालचं, तुझ्या ऑफिसमधलं तुझं 'प्रगती पथावर' जेट विमानाच्या गतीनं उडणारं वागण!

म्हणतात ना! अपेक्षेत दुःख असतं. आपण पूर्वीच्याच भावना उराशी बाळगून अपेक्षा करायच्या, फार... फार वेगानं काळ बदलतोय ! त्याबरोबर फरफटल्या जाणाऱ्या माणसांचे बदललेले व्यक्तीमत्व! पूर्वीचे संदर्भ बदलेले. अर्थातच, नव्या दृष्टिकोनाची ठेच लागून पूर्वी बाळगलेल्या अपेक्षांचा चक्काचूर व्हायचा!!!

... काल माझं तसचं झालं!

...माझी बदली मुंबईच्या रीझर्व्ह बँकेत झाली आहे. ही बदली टाळण्याचा, नोकरीच्या चाकोरीतले मी सर्व प्रयत्न केले. प्रथम हक्काची साचलेली भरपगारी रजा घेतली. नंतर मेडीकल सर्टिफिकेट सादर करुन आजारपणाच्या सबबीखाली रजा घेतली. नंतर आजारपण लांबल्याची सबब सांगून अर्धपगारी रजाही संपविली! पण मग वरिष्ठांकडून अंतिम उत्तर मागविले गेल्याने, मुंबईच्या ऑफीसमध्ये रुजू होणे किंवा रिसिग्नेशन देऊन नोकरीतून मुक्त होणे, असाच माझ्यापुढे पर्याय होता.

...एकदा माझ्या मनात आलं की, राजीनामा देऊन मोकळे व्हावे ! दोन मिनटं मन कसं निवांत झालं. कसली कटकट नाही, वेळेवर पोचा, बॉसला खुश ठेवण्यासाठी नाटकी पद्धतीनं एकीकडे लाडंलाडं बोलत आणि दुसरीकडे लेखनिकाची का होईना, ढोर मेहनत करीत कामाचा डोंगर उपसायचा ! .... एकाच पद्धतीचे कंटाळवाणे जीवन. एक वाजता लंच. त्यानिमित्ताने एक तास कामाला बुट्टी. पुन्हा ऑफीस पाचला सुटते म्हणून साडेचार वाजल्यापासूनच काम बंद करुन बाथरुममध्ये जाऊन, पावडर लिपिस्टक ठीकठाक करायची आणि पुन्हा नकली तजेलदार चेहेऱ्याने घरी पाच वाजता ठराविक बसस्टॉपवर थांबून बसची वाट पाहायची.

...अणि घरी परतल्यावर तरी काय मोठं सुख होत? मोठी, शिकलेली, नोकरी करणारी मुलगी, वडिलांच्या मृत्यूनंतर आईचा आधार आणि धाकट्या भावंडांची पालक, म्हणून संसार रेटायचा. मी अविवाहित राहिले.... (म्हणजे ते इतकं अपिहार्य होतं की, कोणा नातेवाईकांनी तोंडदेखलं सुद्धा 'लग्न कर', अस म्हटलं नाही! ) मग अळणी, मनानं, सभोवारच्या मंडळीत समाधानाचा मुखवटा लावून, खोटंखोटंच हसून बोलायचं! त्याबद्दल मात्र सर्वजण माझं कौतुक करीत. 'किती समंजस आणि आनंदी आहे तुमची कुसुम!'

...नोकरी सोडली असती तर, या मन घुसमटून टाकणाऱ्या जीवनातून मुक्त झाले असते. परंतु लगेच विचार आला, आईचा संसार कोण चालवणार? होय ! हा आईचाच संसार होता. तीची मोठी मुलगी म्हणून मी नोकरी करायची, आणि तिच्या दोन लहान मुलींना (म्हणजे माझ्या कॉलेजात शिकणाऱ्या दोन तरुण लहान बहिणींना) सांभाळायचं. बरं त्या लहान बहिणींना तरी आपुलकी, कृतज्ञता वाटायला हवी! पण माझी ती क्षुल्लक अपेक्षाही अपूर्ण राहिली. त्या दोघी तारुण्यसुलभ स्वप्नांच्या दुनियेतील आपल्या 'राजकुमारां' च्या शोधात होत्या. पण तेथे ही आमचे दुर्दैव आडवे आले. त्यांचे जुळत आलेले प्रेमविवाह फिसकटले. त्यांना मात्र नातेवाईकांकडून भरपूर सहानुभूती मिळत आहे. त्यांची वय वाढताहेत. वेळीच लग्न लावून दिली पाहिजेत-काही तरी नेटाने प्रयत्न चालू ठेवले पाहिजेत अशी आमची नातेवाईक मंडळी वारंवार ऐकावायची. प्रेमभंगाच्या दुःखात बुडालेल्या त्या दोघींनी कधी नोकरीचा विचारही केला नाही!



Marathe Pratishthan

...मग मी नोकरी सोडून कसं चालेल? केवळ माझ्यावर अवलंबून असणाऱ्या या तिघी उघड्यावर नाही का पडणार?

...असा कर्तव्यदक्ष विचार करुन मग नोकरी सोडायचा विचारच मनातून हद्दपार केला.

नोकरीत मला हळूहळू बढती मिळाली, पगार वाढला आणि आता तर माझी मुंबईला अधिकारीपदी बदली झालेली. शेवटी मनाचा हिय्या करुन मी मुंबईला आले. एका महिला वसतीगृहात राहिले.

तू मुंबईत असल्याचे मला आधीच माहिती होते. इतकेच नव्हे तर, तू आपल्या व्यवसायात यशाची गरुडझेप घेऊन इतरांना हेवा वाटावा अशा आर्थिक सुसंपन्नतेत रममाण झाला आहेस, हेही मला कळले. मात्र, तू अजूनही अविवाहित राहिल्याचे कळून आश्चर्य वाटले.

कां बरं तू लग्न केले नसावेस, अस मनात नेहमी येई.

तुला मनाजोगी पत्नी मिळाली नाही म्हणून की तुला आवडलेल्या तरुणीने भलत्याशी लग्न केले म्हणून?

मध्यरात्री आकाशात दूरदूर दिसणाऱ्या अंधुक लुकलुकणाऱ्या चांदणीप्रमाणे, मनात क्वचित विचार येई की, तुला माझी आठवण तर येत नसेल ?

या, त्या चांदणीप्रमाणेच, दूरवर असलेल्या शक्यतेचा क्षणभर विचारही, माझं मन तासभर पुलकीत करी.

वीस वर्ष झाली. मी सोळा वर्षाची होते मॅट्रीकच्या परीक्षेपेक्षा माझं लक्ष मुसमुसणारं तारुण्य अधिक आकर्षक करण्याकडे जास्त होतं.

तू आमच्या घरासमोरच्या तळमजल्यावर तुझ्या आतेकडे राहात होतास. बी. ए. च्या परीक्षेला बसणार होतास. मध्यरात्रीपर्यंत दर्शनी खिडकीजवळील टेबलाच्या बाजूला खुर्चीत अभ्यास करीत बसलेला दिसायचाच.

तुझा चेहरा किती सुंदर दिसायचा ! तुझे माझ्याकडे लक्ष असण्याचे कारणच नव्हतं. तुझ मन अभ्यासात गुंतलेलं व माझं मन मात्र तुझ्यात रमलेलं! निमित्तमात्र पुस्तक हातात धरुन मी तुझ्याकडे टक लावून तासन् तास बघत असायची.

एक दिवस माझ्या मनात असं काही तुफान उठलं की मी सरळ सकाळी साडेदहा वाजता तुझ्या घरी आले. तुझ्या आत्याचे यजमान ऑफिसला गेल्याचे मी पाहिले होते. तुझी आत्याही खरेदीच्या (बहुधा) निमित्ताने बाहेर पडलेली पाहिली होती. मी सरळ दार ठोठावले.

'काय पाहिजे?' दार उघडून तू विचारलेस मी अडखळत म्हणाले, ''म... मला गणितातील एक डिफीकल्टी विचारायची आहे.''

तू अनोळखी भावाने प्रश्नार्थक चेहेऱ्याने माझ्याकडे बघत राहिलास. तेव्हा माझ्या लक्षात आले, माझी ओळख करुन देणं आवश्यक होतं. मी म्हणाले, ''मी कुसुम. समोरच्या घरी राहते. मॅट्रिकला आहे. आपण मला गणितात थोडी मदत केली तर चांगले होईल. मी एका दमात सांगितले.''

पण मी कधी गणित विषय घेतलेला नाही, तू हसत म्हणलास.

मग माझ्या इंग्रजीच्या डिफिकल्टीज् सोडवा, मी नेट लावून उत्तर दिले.

'आलं लक्षात,' तू मला घरात घेताना म्हटलेस.

...आणि त्यानंतर तू एकटा असताना मी माझ्या 'डिफिकल्टीज' सोडवून घेऊ लागले.

आमचा सहवास वाढत गेला. एका दुपारी तूच मला 'डिफिकल्टी' त टाकलेस! म्हणालास ''हे पहा कुसुम, आज रात्री माझी आत्या आणि तिचे यजमान दोघेही नाटकाला जाणार आहेत. नाटक झाल्यावर, परस्पर बाहेर जेऊनच रात्री अकरा वाजता परतणार आहेत. तर तू कसंही करुन माझ्याकडे रात्री नऊ वाजता दहा मिनिटांकरिता ये!''

मला तुझा अनपेक्षित बेत अजिबात मानवला नाही. मी चक्क नकार दिला. त्यावर तू प्रथम खूप चिडलास. नंतर अगदी काकुळतीने माझी विनवणी करु लागलास, कुसुम, ''आज रात्री माझ्याकडे तू दहा मिनटांसाठी ये. ये ना, मग वाटलं तर.... दहा महिने... दहा वर्ष येऊ नकोस, पण आज मात्र अवश्य ये. अशी संधी पुन्हा मिळणार नाही.''

त्यावेळचा तुझा चेहरा मला अजून आठवतो. तुझ्या चेहेऱ्यावर प्रणयाची ओढ दिसत होती. भाव अतिशय कोमल अजीजीचे दिसत होते. डोळे पाणावले होते. असं वाटलं की, मी जर नाही म्हटले तर टचकन् तुझ्या डोळ्यातून अश्रू गळतील.

आणि त्या अवस्थेत मी तुला होकार दिला. मग तुझी मुद्रा शांत झाली. तुझ्या चेहेऱ्यावर त्यावेळी दिसलेले शांती-समाधानाचे भाव अजूनही माझ्या डोळ्यासमोर तसेच दिसत आहेत.

मग त्या रात्री मी एका वज्रनिर्धाराने तुझ्याकडे आले. घरी मी चक्क खोटे सांगितले. (तीव्र इच्छा असली की मार्ग सुचतोच ही म्हण खरी ठरली.) आईला सांगितले की. उद्या आमची परीक्षा आहे. आणि माझ्या नोटस् जवळच रहात असलेल्या माझ्या मैत्रिणीकडे आहेत, आणि तिच्याकडून

Marathe Pratishthan

अभ्यासाची माहिती घेऊन मी तासाभरात परतते.

...आणि आईच्या होकाराची वाट न पाहता तडक घराबाहेर पडले. थोडा वळसा घालून तुझ्या घरी आले. तू चटकन् दार बंद करुन घेतलेस.

...आणि मग अर्धा तास कसा संपला ते कळलचं नाही.

अंतिम मर्यादा सांभाळून, तारुण्यातील पहिल्या प्रणयभेटीत दोघे बेहोषीने धुंद झालो.

पण लगेच मी भानावर आले. तुझ्यापासून दूर होत म्हटलं ''मी जाते.''

तू म्हणालास, ''थोडा वेळ थांब ना.''

आता मी म्हणाले, 'मला गेलंच पाहिजे.' 'पुन्हा कधीतरी येईनच. पण आता मला तुझा एखादा फोटो दे.' तू म्हणालास, ''आता कुठे फोटो देऊ?'' देईन पुन्हा कधी तरी. मी हट्टच धरला. म्हटल, तुझ्या आयडेंटिटि कार्ड मधला दिलास तरी चालेल. मग तू निमूटपणे आपल्या आयडेंटिटि कार्डावरील चिकटविलेला फोटो काढून दिलास. त्या फोटोतील तुझ्या चेहेऱ्यावरचे भाव अधिकच कोवळे आणि निरागस दिसत होते. फोटो घेऊन मी परतले.

...पण त्या भेटीनंतर पुन्हा तशी निवांत भेट झाली नाही. तसा योग आला नाही. परीक्षा झाल्यानंतर तू आपल्या गावी आईवडिलांकडे गेलास, पुन्हा नागपूरला परतला नाहीस. तुझ्या आत्याकडून कळले, पुढील शिक्षणासाठी तू मुंबईला गेलास. मला खूप आशा वाटत होती. तुझे निदान एखादे पत्र तरी येईल. पण तसे तू केले नाहीस. तुझ्या आत्याला मात्र, तीन-चार महिन्यांनी कार्ड पाठवायचास अगदी त्रोटक, ठराविक मजकूरच. त्यात माझा उल्लेखही नसायचा. मग अधून-मधून तुझ्या प्रगतीची माहिती मला आत्याकडून कळू लागली.

...तुझ्या मनात माझ्याबद्दल कसलाच विचार नसावा, याचे चित्र स्पष्ट झाले. मीही घडल्या प्रसांगाची आठवण करणे सोडले.

आणि तरीही, कधीतरी मध्यरात्री खिडकीतून आकाशाकडे पाहताना, दूरवर दिसणाऱ्या अंधुक चांदणीप्रमाणे तुझ्या सहवासाची आठवण मनःचक्षूंना दिसायची!

...आणि मग जवळजवळ वीसवर्षांनंतर, काल तुझ्या नरीमनपॉईंट विभागातील वातानुकूलीत ऑफीसमध्ये तुझी भेट घेतली. मुंबईला वसतीगृहात स्थिरावल्यानंतर, मी टेलिफोन डिरेक्टरीतून तुझा नंबर मिळविला. तुझ्या टेलिफोन ऑपरेटरने तुझा पत्ता सांगितला. त्यानुसार, अन्य सर्व कामे बाजूला ठेवून मी तुझ्या ऑफीसमध्ये आले. प्रथम रिसेप्शनिस्टने माझे भेटण्याचे कारण आणि नांव लिहून घेतले. तेव्हा मी खाजगी भेट असे नोंदले. ऑफिसच्या पहिल्या भागात एक टेलिफोन ऑपरेटर-कम रिसेप्शनिस्ट, दोन स्टेनो टायपिस्ट आणि एक पांढऱ्या केसांचा प्रौढ अनुभवी व्यवस्थापक दिसला. मुंबईतील ऑफीसमध्ये शोभतील अशा तुझ्या ऑफीसमधील सेविका होत्या. माझी चिठ्ठी आत पोचल्यानंतर पाच मिनिटांनी, मला तुझ्या दालनात पाठविण्यात आले. तुझ्याशी दोन गृहस्थ व्यवसायासंबधी काही बोलत होते. तू खुणेनेच बाजूच्या कोचावर बसण्यास सांगितले. दहा मिनिटे तशीच गेली. त्यावेळी मी तुझ्या बदललेल्या स्वरुपाचे निरीक्षण केले. वयाने चाळीशीत असलास तरी, तुझे व्यक्तिमत्व त्यामानाने अधिक तरुण आणि रुबाबदार वाटत होते.

चेहेऱ्यावरचे व्यवहारी आणि मुरब्बी उद्योगी व्यक्तीचे भाव स्थिरावले होते. मोजकं आणि नेमकं बोलणं, निश्चित निर्णय, आणि समोरच्या व्यक्तीच्या होकाराचा किंवा नकाराचा कोणताही परिणाम न दिसू देण्याचा स्थितप्रज्ञपणा मला प्रकर्षाने जाणवला.

कामासाठी आलेली माणसे निघून गेली. इतक्यात तुझ्या स्टेनोने लडिवाळपणे तुला सूचना दिली, 'सर, लंचची वेळ झाली. आतल्या रुममध्ये लंच तयार आहे. मॅडमसाठी काय पाठवू?'

तू निर्विकारपणे सांगितलेस, 'आणखी एक लंच.'

मग स्टेनोने दार उघडले आणि मला आतील खोलीत चलण्याची विनंती केली. मी निमूटपणे आत जाऊन बसले.

पाच मिनिटांनीच तू तुझ्या लंच केबिनमध्ये आलास. दार बंद केलेस.

मी मोठ्या आशेने तुझ्याकडे पाहून हसले. मात्र तू त्याची परतफेड एका हिशोबी व्यवहारी हास्याने केलीस! म्हणालास, 'प्रथम जेवण, नंतर बोलू.'

माझ्या प्रतिक्रियेची वाट न पाहता तू लंच घेण्यास सुरुवात केलीस. माझ्याकडे न बघता.

मग मीही तसेच केले.

लंच आटोपल्यावर, तू काही चौकशी करशील अशी माझी अपेक्षा होती.

तू माझ्याकडे पाहून काही बोलणार, इतक्यात तुझ्या स्टेनोने, ''मे आय कमींग सर?' असे म्हणतच प्रवेश केला. तिने सांगितले, मिस्टर बिलिमोरिया आले आहेत. त्यांना महत्वाच्या कामासाठी तातडीची भेट हवी आहे. काय सांगू

त्यांना?''

मला वाटलं की तू त्यांना बाहेर थांबायला सांगशील.

पण घडलं उलटंच! मलाच म्हणालास, '' कुसुम अस कर, उद्या सकाळी ८ वाजता मला फोन करुन निवांत भेटीची वेळ ठरवूया. म्हणजे मनमोकळे बोलता येईल.''

माझ्या होकाराची वाट न पाहताच तू स्टेनोला म्हणालास, ''मिस्टर बिलिमोरियांना आत पाठव. आणि मला डोळ्यानेच बाहेर जाण्यास खूणावले.'' मात्र, 'बाय! सी यू टुमारो,' असे म्हणायला विसरला नाहीस.

मला काही पर्याय उरला नही. मी तडक वसतिगृहात परतले. खोलीचे दार बंद करुन, स्वच्छ वॉश घेतला आणि ड्रेसिंग टेबलाजवळ येऊन बसले.

समोरच्या आरशात माझ्याच प्रतिबिंबाकडे पाहात मी विचार करु लागले.

माझ्या स्वरुपाची वास्तविकता ठळकपणे प्रथमच लक्षात आली. आता माझ्या चेहेऱ्यावर वीस वर्षापूर्वीच्या काहीच खुणा शिल्लक राहिलेल्या नव्हत्या. चेहेरा तोच होता. पण निर्जीव बाहुलीचे भाव स्पष्ट दिसत होते. निर्विकार. निबर आणि डोळ्यात देण्या-घेण्याचे कोणतेच आव्हान नसलेली निस्तेज दृष्टी. डोक्यावरील विपुल केश संभारात रुपेरी झाक वाढलेली.

तुलनेने तू मात्र पूर्वीसारखाच तरुण होतास. तजेलदार, आधिकच बळकट, पण कोमल भावनांचा लवलेश नसलेला चेहरा. जणू काही तू मिळविलेल्या सांपत्तिक यशाने तुझ्यातील कोमल आणि सात्विक, प्रामाणिक विचार नष्ट झालेले. माझ्याशी झालेले वागणे पूर्णतः तटस्थ आणि त्रयस्थ होते !

...मग, आता उद्या कशाला फोन करायचा? न सांगताही सर्व स्पष्ट झाले होते. म्हणूनच हे पत्र लिहिले आहे.

आता पुन्हा भेटण्याचा प्रश्नच संपला आहे.

कधीतरी मध्यरात्री आकाशात मला दिसणारी धूसर चांदणी, आता नेहेमीकरिता लुप्त झाली आहे. पुन्हा कधीही न उगवण्यासाठी, न दिसण्यासाठी. कळावे.

- कुसुम

ता. क.

पत्रासोबत तुझा आयडेंटिटी कार्डवरील तू दिलेला फोटो जोडला आहे. त्या फोटोतील तुझे व्यक्तिमत्व आता संपले आहे. तुझ्या त्या व्यक्तिमत्वास श्रद्धांजली! उत्तराची अपेक्षा नाहीच. म्हणून माझा पत्ता लिहिलेला नाही.

- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०)

---

# कावळा

मानवाप्रमाणेच कावळ्यांत काळे-गोरे भेद आहेतच! बुद्धिमत्ता हे या पक्षाचे वैशिष्ट्य असून शिवाय दुसऱ्याच्या व्रणावर चोचा मारण्याचा स्वभाव त्याने मान मोडूनच उचलला असावा! शिवाय वेळी अवेळी कावकाव करुन इतरांना सतावणे, हावरटपणा करणे, ऐनवेळी (पिंडदानाच्या वेळा) गरज असूनही न येणे, आल्यास काम (पिंडास शिवण्याचे) न करणे हे ही स्वभाव साम्यच!

कराचीत म्हणे कावळ्याचे सूपच रस्त्यांवरील हातगाड्यांवरुन कोंबडीचे सूप म्हणून विकले जाते व लोकही खुशाल डोळे झाकून ते विकत घेतात व प्राणहितकारक असे ते सांगितले जाते.

परंतु मानवाचे अंतरंग काळे असल्याचा अनुभव जसा बऱ्याच वेळा येतो, तसा कावळ्याच्या बाबतीत मात्र आलेला कोणी फारसा ऐकलेला नाही एरवी काकस्नानाचा गुणधर्म बऱ्याच मानवांनी त्यांच्यापासून उचललेला आढळतो खरा! (कावळ्याची आंघोळ) लोचटपणाही घेतलेला आहेच. नको तिथे घाण करुन ठेवणे हे वैशिष्ट्यही मानवाने त्याच्या पासूनच उचलले आहे! काही मानवांत तर आवाजातही कावळ्याचे साम्य आढळून येते.

असे असले तरी कावळा हा शुभ संकेताचे प्रतिक देणारा समजला जातो.

कावळा शितला तर लाभ होईल असे म्हणतात. ''पैलतीरी काऊ कोकताहे शकुन गे माये सांगता हे'' ज्ञानोबामाऊलींची विराहिणी आर्त स्वरात आळवणी करते. विठुरायाच्या आगमनाची गोडशुभ वार्ता दिलीस तर दहीभाताची ऊंडी लावीन तुझ्या तोंडी असे अमीष कावळ्याला दाखविते.

प्रेषक

कु. मधुरा प्रभाकर मराठे. (पृ.१२०)

**सुभाषित सुविचार**

वनी तीर्थी फिरोनी आला।
आपुला गाव नाही सुधारला।
तो कैसा म्हणावा महाभला
एकटाची ?
-राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

## .... आणि अॅडमिशन मिळाली

डॉ. सुरेंद्रनाथ मराठे (पृ. २८४)

पन्नासएक वर्षापूर्वीची आठवण आहे ही. त्यावेळी शिवाजी विद्यापीठ सुरु झालं नव्हतं. त्यामुळे कोल्हापुरातील कॉलेजचं शिक्षण पुणे विद्यापीठाच्या अंतर्गतच असे. मी कोल्हापुरातल्या राजाराम कॉलेजमधून बी.एस्स.सी झालो. त्यानंतर एम.एस.सी. करण्यासाठी पुणे विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात प्रवेश घेतला होता. त्यावेळी हा दोन वर्षांचा कोर्स करण्यासाठी प्रथम वर्षी ब्री.एस.सी (ऑनर्स) ही पदवी परीक्षा, मग दुसऱ्या वर्षी एम.एस.सी. ची असे. ऑनर्सची परीक्षा कमीत कमी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाल्यासच एम.एस.सी.च्या परीक्षेचा फॉर्म मिळायचा.

माझी ऑनर्सची परीक्षा संपल्यानंतर मी आणि काही मित्र कोल्हापूरला सुट्टीमाठी आलो. काही दिवसांनी परीक्षेचा निकाल लागला. प्रथम श्रेणी मिळल्यामुळे एम.एस.सी. साठी प्रवेश मिळण्याची खात्री होती. लगेच त्यासाठीचा फॉर्म भरुन रजिस्टर पोस्टानं पुणे विद्यापीठाकडे पाठवला. फॉर्म मिळाल्याची पोच पावती विद्यापीठाकडून आली. रसायनशास्त्र विभागात चार शाखा खुल्या होत्या. प्रत्येक शाखेत १२ जणांना प्रवेश मिळणार होता. मला फिजिकल मध्ये प्रवेश हवा होता. तसं मी फॉर्ममध्ये नोंदवलंही होतं.

आता प्रवेश मिळण्याच्या पत्राची वाट पाहात होतो. अचानक एके दिवशी तार आली. रसायनशास्त्र विभागात संशोधन करणऱ्या एक मित्रानं ती पाठवली होती. त्यानं नोटीस बोर्डावर प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावं पाहिली. माझं नाव कोणत्याच विभागाच्या यादीत नसल्यामुळे त्याला आश्चर्य वाटलं. मार्क चांगले असल्यामुळे मला प्रवेश मिळणार आहे, हेही त्याल माहीत होतं. म्हणूनच त्यानं ताबडतोब तार केली. मला ही तो धक्का होता. घरातले सारेच गडबडून गेले. लगेचच पुण्याला निघायचं ठरवलं. माझ्याबरोबर एम.एस.सी. फिजीक्ससाठी शिकत असलेल्या मित्राची कोल्हापुरात रोज भेट होत असे. त्याला ही बातमी सांगितली. तोही माझ्याबरोबर यायला तयार झाला. त्याला प्रवेश मिळाला होताच.

आम्ही पुण्याला पोहोचलो आणि तडक विद्यापीठात रसायनशास्त्र विभागात गेलो. विभागप्रमुख डॉ. जतकर हे तिथं होतेच. त्यांना मी माझी ऑनर्सची मार्कलिस्ट आणि प्रवेशासाठीचा फॉर्म विद्यापीठात पोहोचल्याची पोचपावती दाखवली. तरीही एम.एस.सी. साठी प्रवेश दिला गेला नाही, हे सांगितलं. त्यांनाही आश्चर्य वाटलं. त्यांनी या बाबतची चौकशी करुन मला कळविण्याचं आश्वासन दिलं. दोन दिवसांनी भेटायला सांगितलं. भेटल्यावर त्यांनी सांगितलं, की माझा फॉर्म रसायनशास्त्र विभागात आलाच नव्हता. त्यामुळे प्रवेश देण्याचा प्रश्नच नव्हता. मग मी मित्राला घेऊन कार्यवाहांच्या ऑफिसमध्ये गेलो. त्यांनाही ती पोचपावती दाखवली. त्यांनी विभागाचे रेकॉर्ड तपासले. त्यात माझा फॉर्म मिळाल्याची नोंद होती. मी आणि माझा मित्र विद्यापीठ ऑफिस आणि रसायनशास्त्र विभाग अशा चकरा मारत होतो. बहुतेक माझा फॉर्म दुसऱ्याच ठिकाणी गेला असावा. पुन्हा डॉ. जतकर यांना भेटून सारी हकिकत सांगितली. माझी काहीच चूक नसताना प्रवेश नाकारला गेला आहे, हे त्यांना पटलं. त्यांनी मला दिलासा दिला आणि आपण कार्यवाहांशी बोलू, असं सांगितलं. दोन दिवसांनंतर मी त्यांना परत भेटलो. त्यांनी मला आनंदाची बातमी दिली, फिजिकल केमिस्ट्रीत १२ सीटची मर्यादा वाढवून १३ सीट केली आहे. तुझं वर्ष वाया जाऊ नये, म्हणून ही खास जागा मंजूर केली आहे.

डॉ. जतकर यांच्यासारख्या मोठ्या व्यक्तीनं माझ्या प्रश्नात जातीनं लक्ष घालून माझं काम केलं, हेच अप्रूपचं होतं. त्यांचा मी मनापासून आभारी आहे.

डॉ. सुरेंद्रनाथ मराठे (पृ. २८४) पुणे फोन नं. (०२०) २४२३१६८६

## हसरे हितगुज

आगगाडी धावत होती. खिडकीजवळ समोरासमोर दोघे जण बसले होते. त्या पैकी एकाचा मफलर वाऱ्याचा झोताने खिडकीच्या बाहेर खाली खाली घरंगळत होता ते पाहून समोरचा माणूस म्हणाला.
''अहो मिस्टर, तुमचा मफलर बाहेर पडेल जरा आत ओढा''. हे ऐकताच तो मफलरवाला एकदम रागावला आणि म्हणाला, ''माझा मफलर खिडकीच्या बाहेर गेला तर त्यात तुमचं काय गेलं''? ''सिगारेटच्या ठिणगीने तुमचा कोट मघापासून पेटलाय तरी मी काही बोललो ''?

## वाचकांचा पत्रव्यवहार

संपादिका 'हितगुज' यांसी
स.न.वि.वि.

हितगुजचे रुपडे बदलत आहे त्याबद्दल अभिनंदन! प्रतिष्ठानची भरभराट होवो ही सदीच्छा!

मराठे मोरेश्वर लक्ष्मण
१४, कल्पतरु अपार्टमेंट, गेस्टहाऊस जवळ,
मिरज रोड, सांगली - ४१६ ४१५.

Marathe Pratishthan

# प्रेमळ राखीचा बंध

डोळे पाणीदार, नाक धारदार, मध्यम उंची, बांधा बाकदार
पंजाबी ड्रेस, कधी जीन्स-टॉप
आवड तिला दागिन्यांची असे अमाप

एक तपापूर्वी उंबरठ्याचं माप ओलांडून तिने आमच्या डोंबिवलीच्या घरात प्रवेश केला .ती आमची गृहलक्ष्मी माझी सून सौ. राखी. माझा स्वतःचा प्रेम विवाह आहे. त्यामुळे मुलांनीही तसं करण्यास माझी ना नव्हती. तरी अत्यंत साधेपणाने स्थळ पाहून म्हणजे ठरवूनच राखीचं लग्न ठरलं. एकुलती एक मुलगी म्हणजे लाडावलेली, हेकेखोर असा आमचा समज राखीने आपल्या आचरणाने खोटा ठरवला. आमच्या घरात ती पूर्ण सामावून गेली. ठाण्याला घेतलेल्या घरात नवीन घरात सर्वांनी एकत्र राहण्याचं ठरल तेही तिच्याच आग्रहामुळे सर्वांनी त्या नवीन घरात राहण्याच्या निर्णयामुळे नवी वहिनी आणि नणंद यांचा सहवास घडावा, ही माझी इच्छा पूर्ण झाली. मामे, मावस, चुलत भांवडातील मोठी वहिनी म्हणून सर्व सगेसोयरे आणि नातेवाईकांचं आगत-स्वागत राखी अत्यंत चांगल्या पद्धतीने करते.

गेल्या वर्षी आजारपणातून बाहेर पडल्यावर, नियमित व्यायाम करुन तिने ठाणे हिरानंदानी अर्ध मॅरेथॉनमध्ये भाग घेतला आणि ती यशस्वीरित्या पूर्ण केली. नुकत्याच झालेल्या लवासा वूमन ड्राइव्ह २०१४ मध्ये सुद्धा राखीने भाग घेतला आणि उत्तम आघाडी साधली. ती उच्चशिक्षीत आहे. शिवाय तिचं इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आहे. त्यामुळे तिची नणंद सुचित्राच्या कुचिपुडी नृत्योत्सवातही तिने अत्यंत प्रभावी आणि रंजक निवेदन केलं. राखी घरच्या सर्व आघाड्या उत्तम सांभाळते. पैशाचे व्यवहार उत्तम करत घरखर्चाचा ताळेबंद छान जमवते. तिला स्वयंपाकाची, विविध चटकदार पदार्थ बनवून सगळ्यांना आग्रहाने खाऊ घालण्याची हौस आहे. आमच्या घरात काही मोजकेच धार्मिक विधी आहेत. परंतु राखी ते अत्यंत आवडीने आणि सातत्याने करत आहे. घर सजवणं, प्रसंगानुरुप भेटवस्तू देणं-घेणं तिला मनापासून आवडतं. तिने घराची सगळी आघाडी उत्तमपणे सांभाळल्याने मलाही माझं निवृत्तीनंतरचं जीवन सुखाने उपभोगता येतं. माझ्या मैत्रिणींच्या आगत-स्वागतातही ती कोणतीच कसर ठेवत नाही. माझे छंद, माझी कला यांना वाव मिळावा, यासाठी ती कायम प्रयत्नशील असते. ऑफिस, घर यामध्ये योग्य समतोल राखणं, कोणतेच नियम न मोडता अत्यंत शिस्तशीर वागणं. हे करताना आरोग्याचंही भान राखणं अशी तारेवरची कसरत करणारी राखी माझी सून नव्हे तर मुलगीच आहे.

श्रीमती कुमुद डोके, ठाणे (पृ.३६६)
फोन : २५८८१६५५

# पापाचे प्रायश्चित

कुठेतरी काहीं चुकले पण जन्माला आले ।
फेड तयाचा याच जन्मी भाकीत हे सत्य असे ।।
बालपणी शिकलो नाही । देवाला भजले नाही
अपशब्द गुरुजनांस झाले। सारे हे विसरुं कसे ।।१।।
कुसंगत सारी नडली । नाना व्यसने जडली,
अपमानीत झालो ठायी, ठायी । जिथे तिथे मी फसे ।।२।।
क्रुद्ध होई पिता यावरी । विद्ध जननी अश्रु आवरी
बंधु भगिनींच्या मुकलो प्रेमा। स्नेही फसवे असे कसे ।।३।।
मुक्त होती दाही दिशा मज । अंधाराचे बनलो सावज
चौर्यकर्महि हातून घडले । अन्नासाठी पाप दिसे ।।४।।
धर्म बनला कुकर्म माझा |दुष्कीर्तीचा पुतळाच दुजा
कारावासही सुरु जाहला । भयकंपित मन आतां कसे ।।५।।
भिती माझी वृथाच ठरला । दुष्कर्मांचा व्यथा संपली
माणुसकीची गाथा दिसली । सत्य असे हे स्वप्न नसे ।।६।।
उद्योगाची कास धरी मी । विरल्या साऱ्या वाईट उर्मी
पुनर्वसन 'माझे' ध्येय ठरले नवजीवन मंडळ साक्ष असे ।।७।।
जातपंथना येथे कांही । भेदभाव ना कुठे जराही
कार्याची तर सक्ती येथे मानण्याची आसक्ती असे ।।८।।

अच्युत म. चक्रदेव चिंचवड (पृ. क्र. ७३२)

# आजीबाईचा बटवा

**नाचणी** : वजन कमी करण्यासाठी आहारात नाचणीचा वापर केला जातो. स्थूल आणि मधुमेही लोकांसाठी नाचणी खाणे उपयुक्त ठरते.

**मुळा** : मूतखड्याच्या विकारांवर मुळ्याच्या पाल्याचा रस प्यावा. मुतखडा मोडण्यासाठी मुळ्याच्या बियांचे चुर्ण खावे. पोटांतील कृमी व वायू धरणे यांसाठी मुळा मीठ लावून खावा.

**मेथी** : केस गळणे, केसांतील कोंडा यासाठी मेथीच्या रसाने केस धुवावेत.

**कारले** : कफावर आराम मिळण्यासाठी कारल्याचा रस प्यावा. पोटातील जंतासाठीही कारले उपयुक्त ठरते.

**गाजर** : गाजर खाल्याने रक्त वाढते. शरीर भाजल्याच्या जखमा झाल्या असतील तर गाजर खावे त्याने भाजल्याची जखम भरते.

**कडुलिंब** : मधुमेही माणसाने जखम सडू नये लवकर भरुन यावी यासाठी कढिनिंबाचा रस वापरावा.

Marathe Pratishthan

सौ. निलीमाताईंनी त्यांचे मोठे दीर कै. शशिकांत प्रभाकर विद्वंस (वय ७५) यांचे निधन झाले त्यावेळी त्यांच्या जाऊबाई श्रीमती रोहिणी व त्यांचे कुटुंबीय यांचे सांत्वन व्हावे व त्यांना या दुःखातून बाहेर पडण्याचे बळ मिळावे यासाठी त्यांना कविता सुचली ती भावपूर्ण कविता हितगुजच्या वाचकांनाही आवडेल म्हणून प्रकाशीत करीत आहोत.

## हा नियतीचा खेळ निराळा

नियतीचा खेळ असे न्यारा, उघड्या नयनी बघतो आपण सारा ।
दैवाच्या गती असती गहन, करावे लागते आपणांस ते सहन ।।

काळाने घातला घाला एका क्षणात, भयाणतेचा कल्लोळ उसळला हो मनात ।
आंताच बोलणारा साथी, दुःख डोंगर ठेवून गेला माथी।।

नियतीने खेळला हो खेळ, कसा घालावा हो त्याचा मेळ ।
असंख्य कां चा प्रश्न मनात, उत्तर नव्हते साऱ्याच जनात ।।

चार दिवसांचे सखे सोबती, प्रेमळ शब्द घेऊनी बसतात भोवती ।
अन्यजनांचे दुःखाचे दिवस चार, गुंतवू नकोस कोणास फार ।।

इतरांचे कार्यक्षेत्र असते महान, तुमचे दुःख असते मुंगी एवढे लहान ।
आपणच साऱ्यातून मार्ग काढावे, मनाविरुद्ध त्यात न कोणास ओढावे ।।

पूर्व संचित आपुले असते, दैव आपुले आपल्यावरीच रुसते ।
घेऊनी ओझे चढत होतीस जिने चार, कष्टास नव्हती कधी तुझी माघार ।।

आई-बाबांचे कर्तव्य पाडीत होतीस पार, मानीत नव्हती कशातच हार ।
बाळमुखी घालीत होतीस गोड घास, आनंदाने सोडित होती तूं निश्वास ।।

गोड तुज फळ मिळाले, पुत्र तुझे मार्गी लागले, ।
सुना जणु तुझ्या लेकी, कामात फारच त्या नेकी ।
नातवंडाचे प्रेम तुजवरती, रमव जीव त्यांच्या संगती ।।

विहीणबाई तुझीच सखी, नातवंडाचे गुणगान तुमच्यामुखी ।
परि रहावे कमलपत्राप्रमाणे, बदलतात नवे जमाने ।।

ईश चिंतनी मन रमवावे, पुण्यफल साठवीत जावे ।
प्रभू देईल सुख शांती मना, जेऊ घातलेस तूं ही साऱ्या जना ।।

आयुष्याच्या सायंकाळी मिळो तुला सुखाची झोळी, ईश चरणी हीच प्रार्थना तुजसाठी वेळोवेळी ।
म्हणशील तूं सांगणे असते सोपे, परि उत्तम बीयांची उत्तम असती रोपे ? ।।

सुख दुःखाच्या कोणत्याही वेळी, असेन जर मी तर उभी नक्कीच तुजजवळी ।
उपदेश मानू नकोस ह्याला, प्रेमळ संदेश देते तुजला ।।

सौ. निलिमा विष्णू विद्वांस बदलापूर (पूर्व) (पृ.६५८)
मोबाईल : ९८६०८३४८६१

## आजीबाईचा बटवा

**कोकम** : नितळ चेहऱ्यासाठी कोकम तेलाचा वापर करावा. कोकम तेलाचा उपयोग थंडीत पाय, ओठ, गाल फुटणे या करता येतो.

**सफरचंद** : वारंवार होणारे जुलाब थांबविण्यासाठी सफरचंद उपयुक्त फळ आहे.

**तुळस** : तुळशीच्या पानांचा रस क्षयरोग, सर्दी, खोकला यांसाठी उपयुक्त आहे. चेहऱ्यावरील पुटकुळयांसाठी तुळशीचा रस पिणे उपयुक्त ठरते.



Marathe Pratishthan

# ज्ञानाचा एका..........

संत ज्ञानेश्वरांचा काळ इ. स. १२७५ ते १२९६ जन्म आपेगांव, वडील विठ्ठलपंत कुलकर्णी, आई रुक्मीणीबाई, निवृत्तीनाथ वडील बंधू व गुरु सोपान आणि मुक्ताबाई लहान भावंडे, यजुर्वेदी ब्राह्मण, नेवासे येथे ज्ञानेश्वरी लेखन, आळंदी येथे समाधी (१२९६),

ज्ञानेश्वरांच्या काळात म्हणजे तेराव्या शतकात देवगिरीस, यदुवंशविलासु । जो सकळकालनिवासु । न्यायाते पोरवति । क्षितीशु अशा रामदेवराय यादवाची कारकीर्द गाजत होती. वैभव आणि संपन्नयुक्त असे त्याचे राज्य होते. रामदेवराय धार्मिक वृत्तीचा होता. त्याने अनेक पंडित, विद्वानांना राजाश्रय दिला.

## व्रतांचा अतिरेक

या काळात वैदिक पंडित यज्ञयागाचे अवडंबर माजवित होते. राजस सुखे भोगावयास मिळावीत म्हणून भोगासक्त वृत्तीने यज्ञयाग होत होते. वाढत्या संपन्नतेबरोबर महाराष्ट्रातील धार्मिक व सामाजिक जीवन अधःपतीत होत होते. रामदेवरायाच्या पदरी हेमांडपंडित व बोपदेव हे विद्वान लेखक होते हेमांडपंडिताने 'चतुर्वर्ग चिंतामणी' ग्रंथ लिहिला. या ग्रंथात अनेक नियम, व्रते, संकल्प सांगितली आहेत. लोक या ग्रंथाला प्रमाण मानून, अनुसरुन, व्रते नैमत्तिके करण्यात गुंतले. त्याने दोन हजार व्रते या ग्रंथात सांगितली आहेत. एवढी व्रते इतर धर्माच्या कुठल्याही ग्रंथात सांगितली नाहीत. स्वतः रामदेवराय ही व्रते,नैमत्तिके, दिनचर्या यांत इतका गुंतला की राज्याकडे, लष्कराकडे, सैन्याकडे त्याचे दुर्लक्ष झाले. अल्लाऊद्दीन खिलजीने इ. स. १२९४ मध्ये देव गिरीवर स्वारी केली तेव्हा रामदेवरायाने त्याला खंडणी देऊन परतविले होते. त्याच्या काळात धर्माचे अवास्तव स्तोम माजले. श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव वाढला. श्रेष्ठ वर्गाची मिरासदारी वाढली. जैन, लिंगायत व महानुभाव हे तीन पंथ वैदिक धर्मावर वर्चस्व मिळवून आपापली प्रतिष्ठा वाढवित होते. वैदिक परंपरा खिळखिळी झाली होती. यज्ञयाग, व्रतवैकल्ये, जप-जाप एवढ्यापुरतेच धर्मभावनेचे क्षेत्र आकुंचित बनले होते. कर्मठपणाचे अवास्तव बंड माजल्यामुळे नैतिक मूल्यांची चाड राहिली नव्हती. उच्चवर्णियांत सुखासीनतेची व भोगविलासाची प्रवृत्ती वाढली होती. ब्राह्मण व क्षत्रिय पराङगमुख झाले होते.

## धर्मजागृतीचे कार्य

काम, क्रोध, मोह, लोभ यांच्या आधीन झालेली ही माणसे सत्य, शांती, विवेक, वैराग्य व आत्मिक समाधान या गुणांना पारखी होत आहेत हे ज्ञानेश्वरांनी पाहिले. अशा स्थितीत या अज्ञानी मोहवश लोकांना मार्गदर्शन करावाचे असेल, वैदिक धर्माची ओहोटी थांबवायची असेल तर या भोळ्या भाबड्यांच्या धर्मभावनेला अध्यत्मविचारांची ठाम बैठक मिळवून देण्याशिवाय गत्यंतर नाही अशी ज्ञानेश्वरांची खात्री पटली आणि 'ज्ञानेश्वरी' सारखा अलौकीक ग्रंथ त्यांनी लिहिला. धर्मजागृतीचे कार्य हाती घेऊन मराठीत रचना केली. ही भाषाविषयक क्रांती ज्ञानेश्वरांनी यशस्वी करुन दाखविली. समाजातील कोणत्याही वयाच्या कोणत्याही जातीच्या स्त्री-शुद्रादिकांना कळेल अशा मराठी भाषेत ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिण्याचे धाडस ज्ञानेश्वरांनी केले. मराठीचा अभिमान त्यांनी

माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिके।
परि अमृताते हि पैजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके । मेळविन ।।

किंवा ये मऱ्हाटियाचिया नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळकरी । किंवा बोली अरुपाचे रुप दावीन । अतिंद्रिय परि भोगवीन इंद्रियांकरवी या सारख्या ओव्यांतून व्यक्त केला आहे.

## एका (संत एकनाथ)

ज्ञानेश्वरांनंतर सुमारे ३०० वर्षांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे पुनरुत्थान घडविण्याचे कार्य एकनाथांनी केले. हे खरे महाराष्ट्राचे नाथ होत. अशा मार्मित शब्दात न्या रानडे त्यांच्या सांस्कृतिक कार्याचे मूल्यमापन करतात. बहिणाबाईंनी म्हटले आहे,''जनार्दनी एकनाथ । खांब दिला भागवत ।।''

## एकनाथकालीन परिस्थिती

ज्ञानदेव आणि नामदेव यांच्यापेक्षा नाथांच्या काळात परिस्थिती अधिकच बिकट झाली होती ज्ञानदेवकालीन महाराष्ट्राची समृद्धि व वैभव लोप पावले होते. दुःख, दैन्य दारिद्र्य आणि अज्ञान नाथकालीन समजात बरेच वाढले. मुसलमानी आक्रमणाने महाराष्ट्राभोवती बंधनें आवळून महाराष्ट्राची, संस्कृत आणि मराठी भाषा यांची गळचेपी सुरु केली होती. हिंदूंची असंख्य देवळे उध्वस्त होत होती. काहींच्या मशिदी झाल्या व कांहींचे दर्गे बनले मराठी भाषेत अनेक फार्शी, अरबी शब्द घुसले. पोटासाठी वेदांची विक्री चालू होती. भोंदूगुरु खूप वाढले होते. पैठण हे तर कर्मठपणाचे माहेरघर बनले होते. वर्णव्यवस्थेच्या कठीण बंधनामुळे बहुजन समाज व शुद्र यांना संस्कृत विद्येचा स्पर्श वर्ज्य होता. त्यामुळे त्यांना खरे ज्ञान झाले नाही. ज्ञानाचा निरास होऊन तर्कट युक्तिवाद वाढत होते. माणसे वारंवार देव बदलीत होते. शुद्र देवतांच्या नवसपूजनाचे प्रस्थ वाढले होते. देवतांना बळी देणे, मांसभक्षण-मद्यप्राशन हाच धर्म मानला गेला. ब्राह्मतेज व क्षात्रतेज



Marathe Pratishthan

पूर्णपणे लोपले 'ज्ञानेश्वरी' तील तत्वज्ञानाचा पूर्णपणे विसर पडला. अशा पडत्या काळात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे आद्य प्रवर्तक एकनाथ होते.

### समन्वयवादी

सोळाव्या शतकातील महाराष्ट्राचे वैचारिक व वाङमयीन वैभव हा एकनाथांच्या मूलग्राही व सर्वसंग्राहक दृष्टीचा परिपाक आहे. आपल्या अलौकिक व्यक्तीत्वाने व असाधारण वाक्चातुर्याने त्यांनी हजारो लोकांची मने अल्पावकाशांत भारुन टाकली. एकनाथांनी ज्ञानेश्वरांचे खंडित झालेले कार्य अधिक उठावदार व व्यापक स्वरुपात पुढे चालू ठेवले. पैठण सारख्या सनातन्यांच्या बालेकिल्ल्यात त्यांनी भागवत धर्माची विजयपताका फडकविली. एकनाथ हे महाराष्ट्रातील उदारमतवादाचे व नेमस्त संप्रदायाचे जनक होत. त्यांचा जीवनक्रम म्हणजे समन्वयवादाचा एक उत्कृष्ट आदर्श आहे. प्रेमळपणा, सौजन्य व शांती हा त्यांच्या व्यक्तित्वाचा गाभा आहे.

पितरांच्या श्राद्धप्रसंगी महारांना भोजनास बोलविणे, चुकलेले महाराचे मूल कडेवर उचलून महारवाड्यात त्याच्या आईकडे नेऊन पोचविणे, तुरुंगातून पळालेल्या गुन्हेगाराला आपल्या घरी ठेवून घेऊन त्याच्या आयुष्याला गति देणे, काशीहून रामेश्वरास जात असता मूर्च्छित गाढवाला पाणी पाजणे व 'हाच माझा रामेश्वर' अशा भावनेची कृतार्थता व्यक्त करणे या साऱ्या गोष्टी एकनाथांच्या श्रेष्ठ परिचय करुन देणाऱ्या आहेत. तात्पर्याने असे पटणारे आहे की, हिंदु समाजातील अत्यंत म्हणजे महार आणि जनावरातील अत्यंज म्हणजे गाढव यांच्याविषयी त्यांची समानदृष्टी आढळते.

वयाच्या बाराव्या वर्षापासून गुरुसेवा, अठराव्या वर्षी सुलभ पर्वतावर सगुण साक्षात्कार, गुरुसोबत तीर्थ यात्रा, पंचविसाव्या वर्षापासून पैठणास गृहस्थाश्रम, ग्रंथनिर्मिती आणि सहासष्टाव्या वर्षी फाल्गुन वद्य कपिलाषष्ठी (इ.स.१५३३ से १५९९) देहावसान अशी नाथांची जिवितयात्रा आहे.

### ज्ञानाचा एका

प्राकृतात ग्रंथरचना करण्याची ज्ञानेश्वरांपासून चालत आलेली परंपरा नाथांनीही पुढे चालविली आहे या दोन संतामध्ये जरी ३०० वर्षांचे अंतर असले तरी दोघांत फार मोठे विचार साम्य आहे. भागवत संप्रदायाचे कार्य आणि साहित्यनिर्मितीचे ध्येय या बाबतीत तर एकनाथ, ज्ञानेश्वरांचे अवतारच वाटतात. वारकरी पंथात 'ज्ञानाचा एका' आणि 'नाम्याचा तुका' असे म्हटले जाते. म्हणजे ज्ञानेश्वरांचाच पुढचा अवतार एकनाथ आणि संत नामदेवाचाच अवतार म्हणजे तुकाराम होय.

ज्ञानेश्वरांनी अडाणी, सामान्य, भोळ्या भाबड्या गरीब समाजासाठी हरिपाठ लिहिला हा हरिपाठ म्हणजे वारकऱ्यांची संध्या इतके महत्व आज ही वारकरी संप्रदायात आहे. अनुभवी लोकांसाठी आध्यात्मिक अनुभवास पात्रता असणाऱ्या पंडित, विद्वानांसाठी अनुभवामृत किंवा अमृतानुभव रचले मध्यमवर्गीय, सर्वसाधारण जन, सर्वांसाठी ज्ञानेश्वरी रचली.

एकनाथांनी ही आपले विचार व्यक्त करण्यासाठी विविध पद्धतीची योजना केली. पंडित आणि

.....पुढील मजकुर पान १५ वर.....

## वाचकांचा पत्रव्यवहार

सौ. सुमेधा मराठे
संपादिका 'हितगुज' यांसी
स.न.वि.वि.

हितगुज मार्च २०१४ च्या अंक बुध. दि. ४/६/२०१४ रोजी पोस्टाने घरी आला. त्या मधील संपादकीय आपण २४ फेब्रुवारी १४ रोजी लिहिले आहे. त्यामुळे अंकाची छपाई वेळेवर न झाल्यामुळे का पोस्टाच्या कारभारामुळे अंक उशीरा मिळाला त्याचा उलगडा होऊ शकला नाही.

पुणे शाखेच्या ३५व्या वर्धापन दिनाच्या वृत्तामध्ये व इतर मजकुरामध्ये अशुद्धता व द्विसक्ति अधिक प्रमाणात आढळली. तथापि विविध साहित्याने नटलेला अंक वाचनिय आहे. तसाच रंगित चित्रामुळे प्रेक्षणिय वाटला त्याबद्दल धन्यवाद !

हितगुजच्या १०० व्या अंकासंबधी - कसा असावा?

प्राचीन काळापासून आपल्या देशांत गरीब ब्राह्मण राहतात. गरीबीतून वर आलेल्या व हयात असलेल्या कपिगोत्रीय बांधव व भगिनींची माहिती तसेच उद्योगांत व विविध कंपन्यामध्ये वरिष्ठ पदावर काम करीत असलेल्यांची माहिती असावी त्याचा उपयोग तरुणांना मार्गदर्शनपर होईल. तसेच कांही ज्येष्ठांच्या (कार्यरत व्यक्तिंच्या) मुलाखती अथवा त्यांची माहिती मागवून ती प्रसिद्ध केल्यास नवीन पिढीला ती उद्‌बोधक व वाचनीय होईल.

असो कळावे,

आपला
चि. त्र्यं. मराठे (पृ. २४८)

बी/२०१, नवसरगम को.हौ. सो.लि.
भुसार आळी, कळवा, ठाणे - ४०० ६०५.



Marathe Pratishthan

विद्ववांनासाठी चतुःश्लोकी भागवत व एकनाथी भागवत, मध्यवर्गीयांसाठी 'रुक्मीणी स्वयंवर' 'भावार्थ रामायण' या सारख्या ग्रंथाची रचना केली आणि समाजातील सर्व सामान्य जो तळाचा वर्ग होता. त्यासाठी भारुडे, लोकगीते, गवळणी रचल्या.

ज्ञानेश्वरांच्या शिकवणुकीला उजाळा देऊन या विविध मार्गांनी उच्चवर्गीयांपासून कनिष्ठ वर्गीयांपर्यंत ती शिकवण पोहोचविण्याचे फार महत्वाचे कार्य एकनाथांनी केले. तत्वज्ञान लोकभाषेत सांगून जनरंजन करता करता लोकशिक्षण देणारे एकनाथ हे पहिले कवी होत.

ज्ञानेश्वरीत मधल्या काळात जे अपपाठ शिरले होते त्यामुळे अशुद्धता आली होती. ते अपपाठ काढून ज्ञानेश्वरी शुद्ध करण्याचे अत्यंत महत्वाचे कार्य एकनाथांनी केले.

श्री शके पंधराशे बरोत्तरी । तारणनाम सवंत्सरी । एका जनार्दन अत्यादरी । गीता ज्ञानेश्वरी प्रति शुद्ध केली ।। ज्ञानेश्वरीपाठी । जो ओवी करील मऱ्हाटी । तेणे अमृताचे ताटी । जाण नरोटी ठेविली । अशी त्यांनी सक्त ताकीदही देऊन ठेवली.

चपलता, लालित्य, मार्दव हे ज्ञानेश्वरी वाणीचे गुण एकनाथांच्या भाषेत दिसत नाहीत. ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेचा कल्पनाविलास एकनाथी ग्रंथात आढळणार नाही. कल्पनेपेक्षा कल्पकतेवर त्यांची मदार अधिक त्यामुळे पदलालित्यपेक्षा एकनाथामध्ये पदचमत्कृतीचा हव्यास दांडगा दिसतो. या गुणविशेषांचा प्रत्यय नाथभागवतात वाचताना येतो. अर्थगौरवापेक्षा अर्थविस्तार, सूचकतेपेक्षा स्पष्टता चित्रकापेक्षा वर्णन परता याकडे एकनाथांचे लक्ष अधिक आहे. त्यामुळे नाथभागवतात पुनरुक्ती, पाल्हाळ हे रचनादोष आढळतात. मात्र एकनाथांच्या विचारप्रधान वाङमयात त्यांच्या वाणीचे धनत्व, पौढत्व व गांभीर्य हे विशेष गुण ऊठुन दिसतात.

ज्ञानेश्वर आणि एकनाथ या दोघासंतांनी सर्वांशी अविरोधाने कार्यभाग साधण्याची हातोटी हस्तगत केली होती. दोघांचीही विरोधापेक्षा सामरस्यांवर सारी भिस्त आहे. दोघांचीही विचार प्रणाली सांप्रदायिक व साचेबंद नाही तर ती चौकटी ओलांडून समन्वयशील व सर्वसंग्राहक अशी आहे. सामान्यजनांविषयी दोघांच्याही अंतःकरणात उत्कट सहानुभीती आहे आणि म्हणूनच ज्ञानी पुरुषांनी दैनंदिन व्यवहारांत अलौकित्व मिरवू नये, आपली कर्तव्ये पार पाडून इतर लोकांना धडा घालून द्यावा असे त्यांनी आवर्जून सांगितले आहे. एकनाथांशी जुळतात ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यावर अजानुवृक्षाची मुळी त्यांना बोचत होती तेव्हा ज्ञानेश्वरांनी स्वप्नात दृष्टान्त देऊन ही गोष्ट एकनाथांना सांगितली, एकनाथांनी तात्काळ ती मुळी दूर केली आणि समाधीचा जीर्णोद्धार केला असे म्हणतात. तात्पर्य ज्ञानेश्वरांचे अनेक भावबंध एकनाथांशी जुळतात आणि 'ज्ञानाचा एका' हे स्पष्ट होते.

डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे (पृ. १२०)

# वाचकांचा पत्रव्यवहार

सौ. सुमेधा मराठे
संपादिका 'हितगुज' यांसी
स.न.वि.वि.

मार्च २०१४ च्या हितगुजचा अंक मिळून बरेच दिवस झाले. त्यामधील आपली 'भ्रम' ही कथा आवडली तसेच अंकातील इतरही मजकूर आवडला.

हितगुजचा १०० व्या अंकासंबधी माहिती समजली. आपल्या वाचकांकडून त्यासाठी भरपूर सुचना येतील व शंभरावा अंक उत्तम निघेल अशी खात्री आहे.

हितगुज निधीसाठी सांगली मिरजेहून काही थोड्या जणांनी वर्गणी दिली आहे. येथील एकूण २७ वर्गणीदार होते. त्यापैकी ज्यांनी वर्गणी दिली नाही व ज्यांचे अंक बंद झाले आहेत त्यांना पुन्हा एकदा वैयक्तिक पत्र लिहून विनंती केल्यास थोडाफार उपयोग होईल असे वाटते.

गेली दोन वर्षे मी कॅन्सरने आजारी होतो. त्यासाठी काय काय ट्रीटमेंट घेतली त्या बद्दलचा 'माझी पहिली केमो' हा लेख सोबत पाठवत आहे. माझी ट्रीटमेंट पूर्ण होऊन ४ महिने झाले आहेत. प्रकृती चांगली आहे. सर्व नित्य व्यवहार सुरु आहेत. हितगुज १००व्या अंका बाबत 'आपले जग' या मासिक पत्रिकेत माहीती प्रसिद्ध करीत आहे. काय माहिती प्रसिद्ध करीत आहे त्याची प्रत सोबत जोडली आहे. त्यात काही अधिक उणे असल्यास कळवावे.

हितगुज मध्ये पूर्वी 'हसरे हितगुज' म्हणून काही विनोद प्रसिद्ध करीत असत. 'आमचा कविता संग्रह' या कवितांच्या पुस्तकात माझे काही विनोद आहेत त्यातील आपल्याला योग्य वाटतील तो हितगुज मधून प्रसिद्ध करावेत.

कळावे,

आपला
वि. म. मराठे (पृ. २३५ ) सांगली

शक्य असल्यास हितगुजचा अंक
श्री. वसंतराव आपटे, संपादक आपले जग,
मु.पो. किर्लोस्कर वाडी, जि. सांगली - ४१६ ३०८. यांना पाठवावा.



Marathe Pratishthan

# समाज सुधारक सावरकरांचे महिलांसंबंधी विचार

## मातृपद हा शाप नसून वरदान

निसर्ग रचनेप्रमाणे जे आपल्या वाट्याला आले आहे ते करणे स्त्रियांचे कर्तव्य आहे. आताही स्त्रियांनी इतर ज्ञानाबरोबरच थोडेसे वैद्यक, शुश्रूषा आदि गोष्टी शिकल्या पाहिजेत. त्याप्रमाणे स्वतःचे नि मुलांचे मानसशास्त्र यांचे तिला ज्ञान असले पाहिजे... हल्लीच्या मुलींना लग्नापूर्वी शिक्षणाचा ताण व नंतर संसाराचा ताण पडतो हे पाहून मला दुःख होते. त्यात नोकरी धरली तर विचारावयासच नको. तेव्हा एक काही तरी करा अशी माझी विनंती आहे. ... जी स्त्री उत्तम संतती निर्माण करते ती उत्तम स्त्री. ... सुंदर, सुदृढ आणि बुद्धिमान मुलाला जन्म दिला की तुम्हाला कर्तव्य नि सुख यांच्या प्राप्तीचा आनंद मिळतो. पुरुषांना मात्र ते भाग्य नाही. ह्या दृष्टीने गृहिणीपद, मातृपद हे स्त्रियांना शाप नसून वरदान आहे.

...जीवनाकडे भव्यतेने पाहा, त्याला वाहून घ्या. चांगली संतती निर्माण करा आणि तिला चांगले शिक्षण देऊन हे राष्ट्र समर्थ नि समृद्ध करण्याचे श्रेय घ्या !

(वर्ष १९५०)

## मुलीची चांगली जोपासना करा

आपल्यात सामान्य समजूत अशी आहे की मुलगा हवा. मुलगी नको. मुलीकडे माता फार थोडे लक्ष देतात. पण ही चूक आहे. मुलीची चांगली जोपासना केली पाहिजे. कारण ही मुलगीच पुढच्या पिढीची जननी आहे. भावी पिढी तेजस्वी नि सामर्थ्यवान निपजावी आणि तिने देशाचे पारतंत्र्य घालवावे अशी तुमची इच्छा असेल तर मुलीच्या जोपासनेकडेही तुम्ही योग्य लक्ष दिले पाहिजे. योग्य वय होईपर्यंत त्यांचा विवाह करु नये. मुलींची अशी समजूत असते की अशक्तपणा म्हणजे नाजूकपणा व तो एक कौतुकास्पद गुण आहे. पण ही त्यांची समजूत चूक आहे. सशक्तपणा हेच खरे सौंदर्य. ईश्वरनिर्मित सौंदर्य आपल्या हातचे नाही पण हे सौंदर्य आपल्या हातचे आहे.

(वर्ष १९२४)

## ललनांचे लावण्य

ललनेच्या लावण्याहून सरस असे दुसरे सौंदर्य स्वप्न सृष्टीलाही अजून पडलेले नाही. ... ललना लावण्य ही जीवनाची एक नयनानंदक शोभाच काय ती नसून ते सृष्टीच्या प्रजनन लालसेचे वशीकरण चूर्ण आहे. जी इतकी गबाळ-नि जितकी कुरुप-ती तितकी सुवृत्त नि सुशील असे मानणारी कलाहीन संस्कृती ही संस्कृती नसून विकृती आहे. पिढीपिढी अशा अरसिक उपेक्षेने ती अधिकाधिक ओंगळ, बेडौल नि भेसूर होत जाते !

## महिलांना आवाहन

लावण्यवती कुमारींनो, जननींनो, तुम्हास जन्मतःच निसर्गाने दिलेल्या ह्या दैवी देणगीस आपल्या पूर्वपुण्याईचे वरदानच माना आणि त्याला आता जपा ! लावण्यच नव्हे तर प्रत्येक स्त्रीने तिला जे रुप जन्मतःच लाभलेले असेल ते त्यातल्या त्यात खुलून दिसावे असा यत्न अवश्य करावा. प्रसाधनांनी आपली कांती, वर्ण, शोभा वाढवावी. स्त्रीचे सौंदर्य ज्यायोगे विकसेल, तिला त्याचा योग्य तो लोभ लागेल. असे उत्तेजन तिला मिळाले पाहिजे.

जीवन हाच एक यज्ञ आहे, सद्गुण वा दुर्गुण ठरविण्याची मानवी कसोटी एकच की मनुष्य जातीच्या सामुदायिक हितार्थ त्या यज्ञास जो उपकारक तो सद्गुण, अपकारक तो दुर्गुण! जर तुमचे लावण्य तुमचे लांछन न ठरविता, दुर्गुण न ठरविता तुमचा एक अत्यंत सौभाग्यास्पद सदंगुण ठरविणे असेल तर त्या लावण्याचा असा सदुपयोग करा की ज्यायोगे तुमच्या राष्ट्राचे कल्याण व्हावे.

...ज्यायोगे मनुष्य जातीच्या कल्याणार्थच त्याचा विनियोग होईल अशाच प्रमाणात नि प्रकाराने सौंदर्यास महत्व द्या, त्यास सत्कारणी लावा, हेच शील ! हे शील जन्मभर पुरणारी नि मृत्यूनंतरही पुरुन उरणारी संपदा आहे. जिला रुप नाही, पण हे परोपकारी वत्सल नि विवेकी शील आहे, ती स्त्री, जिला नुसते रुप आहे, पण हे परोपकारी, वत्सल नि प्रामाणिक शील नाही. तिच्यापेक्षा अधिक गौरवार्ह समजली पाहिजे. परंतु लावण्यवतीनो तुम्ही हे विसरता कामा नये की लावण्य ही तुमच्या हाती सोपविलेली निसर्गाची दैवी ठेव आहे. म्हणूनच या अनर्घ्य निक्षेपाची नैसर्गिक अटही तुम्ही पाळली पाहिजेच. ती अट म्हणजे सुजनन, सुप्रजनन !

जिच्या कौमार्यात लावण्याचा नेत्रानंददायी चंद्र आरोग्याच्या सकल कलाही प्रफुल्ल झालेला आहे, सच्छील यौवनात जिच्या उदरी देवदूतासारखी सुंदर नि सुलक्षणी बालके जन्मली आहेत आणि त्यांना आपल्या त्या लावण्याचे नि शीलाचे ते वत्सल दूध पाजून संवर्धिताना जी स्वतः प्रतिपदेच्या चंद्रकोरी सारखी क्षीण कलांनीच पूर्ण कलापेक्षाही प्रौढावस्थेत सुभग भासत आहे, त्या जननीला आमचे शतवार वंदन असो !

प्रेषक - सौ. मंजिरी श्रीनिवास मराठे (पृ.क्र.३९२)
कोषाध्यक्ष, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, दादर मु. २८.

Marathe Pratishthan

# माझी पहिली केमो

लेखक :- श्री. वि. म. मराठे

तुमच्या वडिलांना कॅन्सर झाला आहे. त्यासाठी ट्रीटमेंट घ्यावी लागेल. कशी ट्रीटमेंट घेणार सौम्य घेणार की हाई घेणार ते सांगा.

वडिलांना विचारुन मग सांगतो.

हे बघा आपल्याला गांवाला जायचे असते तेव्हां आपण स्लो गाडी पकडतो की फास्ट ?

मी विचार करुन सांगतो.

एक कॅन्सरतज्ञ व माझे चिरंजीव यांच्या मधील संवाद मी ऐकत होतो. मला तपासून झाल्यावर मला तपासणीच्या खोली बाहेर पाठविण्यात आले होते व कॅन्सर तज्ञ माझ्या चिरंजीवाना मला झालेला रोग व करायचे उपचार या बद्दल वरील प्रमाणे दोन तीन वाक्यात माहिती देत होते. मला कॅन्सर झाला आहे हे आम्हाला बायप्सी रीपोर्ट वरुन समजलेच होते पण तज्ञ डॉक्टरनी विचारलेल्या वरील प्रश्नाना लगेच उत्तर देणे शक्य नव्हते.

हे बघा काय ते तुम्ही ठरवा व सांगा, उगीच त्यांचा वेळ घेऊ नका असे म्हणून तेथे असलेल्या दुसऱ्या डॉक्टरनी चिरंजीवाना बाहेर जाण्यास सांगितले व दुसऱ्या पेशंटला आत बोलावले. त्यांना वेळ नव्हता हे खरेच होते कारण त्या दवाखान्यात संध्याकाळी पांच वाजता परगांवाहून येणारे ते व्हिजीटींग डॉक्टर होते. त्यामुळे सर्व पेशंट पांच वाजल्यापासून वाट बघत होते त्या दिवशी ते आले साडेसात वाजता!

वरील हकिगत आहे जानेवारी २०१२ मधील. डिसेंबर १९९२ मधे कार्यकारी अभियंता पदावरुन निवृत्त झाल्यानंतर मी विश्रामबाग येथे राहण्यास आलो. सर्व निवृत्तांचे असते त्याच प्रमाणे माझे रुटीन आयुष्य सुरु होते. सकाळी चांगले दोन तीन किलोमिटर फिरणे, संध्याकाळी एका ज्येष्ठांच्या ग्रुपबरोबर वेळ घालवणे. फावल्या वेळांत लेखन वाचन करीत असताना एक कथासंग्रह माझ्या नावांवर प्रसिद्ध केला होता. अधून मधून वृत्तपत्रातील लेखन चालू होतेच. निवृत्त अभियंत्यांची संघटना स्थापना केली होती. जानेवारी २०१२ उजाडला आणि उजव्या बाजूला जांघेत हर्नियाचा त्रास सुरु झाला. सर्जनना दाखवले त्यांनी हर्नियाचे ऑपरेशन करणे जरुरी आहे असे सांगितले मला तपासताना त्यांना माझ्या डाव्या जांघेत एक खारकेएवढी गांठ दिसुन आली. ती मला गेले बरेच दिवस माहीत होती पण काहीत्रास नव्हता म्हणून मी लक्ष दिले नव्हते. त्यांना मी हे सांगितले. मला तपासून मला सोनोग्राफी करण्यासाठी चिठ्ठी दिली. सोनोग्राफीचा रिपोर्ट आला त्यांत पोटात एक गांठ दिसून आसी ती मला मार्च २०११ मध्ये समजली होती पण गांठ म्हणजे कॅन्सर व कॅन्सर म्हणजे केमो! जो फार भयंकर प्रकार असतो असे मी ऐकले होते. तो त्रास मला नको होता म्हणून व त्यागांठीचा काही त्रास नव्हता म्हणून मी ती तमापसायाच्या भानगडीत पडलो नाही. आता डाव्या जांघेतील गांठ काढणेची ठरले. ती गांठ काढली व नमुना बायप्सीला पाठवला. गांठ बघितल्यावर सर्जननी ती थर्ड क्लास कॅन्सरची (बरे होणाऱ्या कॅन्सरची) आहे असे अनुमान काढले. आणि रिपोर्टही हॉड कीन लिम्पोमा असाच आला. आता प्रथम कॅन्सरचे उपचार नंतरच हार्नियाचे ऑपरेशन असे डॉक्टरनी सांगितले. माझा हार्नियाचा त्रास तर एवढा वाढला होता कीं मला चालताही येत नव्हते. मी केमोला घाबरत होतो म्हणून कॅन्सर च्या उपचारासाठी आयुर्वेदीक उपचार सुरु केले. ते उपचार सुरु असतानात हार्नियाचे ऑपरेशन करणाऱ्या सर्जनचा शोध घेणे सुरु होते, व माझ्या नशीबाने अशा एका सर्जनची गांठ पडली त्यांनी पण कॅन्सरचे उपचार झाल्या शिवाय ऑपरेशन करता येणार नाही. पण तुम्हाला होणारा त्रास मी बघतोय म्हणून मी तुमचे हार्नियाचे ऑपरेशन करतो पण नंतर महिनाभर तुम्हाला कोणतीही कॅन्सरची ट्रीटमेंट घेता येणार नाही असे सांगितले व ऑपरेशनचे धोके समजावून सांगितले. अशा रितीने मार्च २६ २०१२ रोजी हार्नियाचे ऑपरेशन झाले.

आयुर्वेदिक उपचार चालूच होते पण मे पर्यंत पोटातील गांठीत काही फरक पडला नाही. मे २२ रोजी डाव्या बाजूच्या हिरड्या एकदम दुखू लागल्या व आगही होवू लागली त्यावर आयुर्वेदीक उपचार सुरु झाले. मे अखेरीस एका मोठ्या कॅन्सर हॉस्पीटलचे नांव समजले तेथे दोन्ही प्रकारचे उपचार होत होते. तेथे सोनोग्राफी, सी.टी.स्कॅन इ सर्व सोपस्कार पार पजले. मला केमो करायची नव्हती तसे मी सांगितल्यामुळे तेथे माझ्यावर आयुर्वेदिक उपचार सुरु ठेवले. हे उपचार म्हणजे दिलेल्या गोळ्या इ. मी सांगलीतच घेऊ शकत होतो ते मला सोयिस्कर होते. आग काही कमी होत नव्हती म्हणून पेन किलर घ्यावा लागत होत्या, पेन किलर व इतर औषधांचा परिणाम व्हायचा तोच झाला व मला पोटात अल्सर झाला व ॲडमिट व्हावे लागले. तो एक वेगळाच अध्याय झाला. मला अशक्तपणा आला सप्टेंबर २०१२ उजाडला व हिरड्या सुजू लागल्या. डेंटीस्ट सर्जनने तपासले व हिरडीवर गांठ आहे व बायप्सी करावी लागेल असे सांगितले मी तेथेच होकार दिला व बायप्सी करता नमुना घेतला गेला तपासणीचा रिपोर्ट आठ दिवसांनी आला तो पण कॅन्सर आहे असाच आला. पण हा पोटातील गाठीपेक्षा

वेगळा कॅन्सर आहे असे डॉक्टरनी सांगितले व ऑपरेशन करुन गाठ काढावी लागेल असे सांगितले. माझा नाईलाज झाला ऑपरेशनची तारीख ठरवायची होती म्हणून घरी निघालो व तोच माझ्या कॅन्सरच्या ट्रीटमेंटचा टर्निंग पॉईंट ठरला. माझी सून सौ. अश्विनी माझ्या बरोबर होती. माझ्या चिरंजीवांनी पूर्वी त्यांच्या एका मित्राच्या डॉक्टर नातेवाईका बरोबर माझ्या आजाराबद्दल चर्चा केली होती. ते डॉक्टर प्रसिद्ध कॅन्सर तज्ञ होते. त्याचेकडे जाऊ असे सौ. अश्विनीने सांगितले. त्या टेस्टचा रिपोर्ट दहा दिवसांनी आला व ती गाठ केमोने विरघळून जाणाऱ्या प्रकारातीलच ठरली. आता तुम्ही केमो करुन घ्या दोन्ही गांठी विरघळून जातील असे सांगून आम्हाला तसी चिठ्ठी दिली आणि ज्या केमोला मी इतके दिवस घाबरत होतो ती केमो घेण्याचा दिवस आला.

केमो साठी दिवस ठरवला. डॉक्टरनी स्पेशल रुम देऊन तिकडे पाठविले. केमो देणारा स्टाफ आला. मी तर घाबरलोच होतो. डॉक्टर कधी येणार म्हणून विचारत होतो. डॉक्टर येतील आम्हाला सुरु करण्यास सांगितले आहे असे सांगून मला आडवे होण्यास सांगितले व केमोसाठी शिरेत सुई घातली. अशा रितीने दि. १० ऑक्टोबर १२ रोजी माझी पहिली केमो झाली.

तोंडातील गांठ दुसऱ्या केमोला कमी झाली सहा केमो मधे पोटातील गांठ अर्धी झाली नंतर सहा केमो गोळ्याच्या झाल्या त्यामुळे इतर बारीक सारीक गांठी गेल्या. आता पुन्हा औषधे बदलून सहा केमो करायच्या होत्या त्या केल्या आहेत व ट्रीटमेंट संपली आहे. (जानेवारी २०१४) आता माझे रुटीन चालू आहे. तब्बेत चांगली आहे. ...आता केमोची भिती गेली आहे. माझ्या नशीबाने पोटातील गांठ ही पचनाच्या वाटेत नाही त्या मुळे माझे जेवणखाण व्यवस्थित आहे. हिंडणे फिरणे व नित्य क्रम चालू आहे. ही परमेश्वराची कृपा ! माझ्यावर उपचार करणाऱ्या व मला धीर देणाऱ्या डॉक्टर बंधूची तर कृपा आहेच. एकच गोष्ट सांगावी वाटते. लेखाच्या सुरुवातीच्या तज्ञ डॉक्टरनी आम्हाला आजाराबद्दल नीट माहिती देऊन धीर देऊन आता केमोचा त्रास होत नाही नवीन औषधे निघाली आहेत घाबरु नका असे सांगितले असते व थोडा वेळ आमच्या साठी खर्च केला असता तर कदाचित पुढील आठ दहा महिने वाचले असते. ते प्रत्येक डॉक्टरनी करणे जरुरी आहे. ते मला हिरडीचे आपरेशन वाचवणाऱ्या व प्रत्यक्ष केमो देणाऱ्या डॉक्टरनी केले व माझी केमोची भिती घालवली. मला आयुर्वेदिक उपचार देणाऱ्या कुणाबद्दलही माझी तक्रार नाही त्यानी मला धीर दिलाच होता. फक्त एकच सांगावेसे वाटते की आपणावर उपचार करणारे डॉक्टर आपल्या गांवातीलच असावेत. परक्या ठिकाणाहून येणारे ते व्हिजीटींग डॉक्टर नसावेत. दुसरे म्हणजे कॅन्सर आहे हे समजल्याबरोबर आधुनीक उपचार सुरु करावेत आता नवीन औषधे निघाली आहेत त्यामुळे साईड ईफेक्टची भिती बाळगू नये आता प्रत्येक कॅन्सर हॉस्पीटल मधे पेशंटला नीट माहिती देण्यासाठी (Counciling) तज्ञ डॉक्टर असतात त्यांचा सल्ला मानावा.

(वरील लेखांत उपचार करणाऱ्या डॉक्टरांची व हॉस्पिटलची नांवे मुद्दाम नमूद केली नाहीत.)

श्री. वि. म. मराठे,
निवृत्त अभियंता
पद्मश्री, विश्रामबाग,
सांगली - ४१६ ४१५.
मो. ९४२०६७८९६५

''हितगुज'' साठी जाहिराती द्याव्यात

अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृत महोत्सव, सहस्त्रचंद्रदर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन हितगुज ला सहकार्य करावे.

पाव पान रु. ६००/-
अर्धेपान रु. १,२००/-
पूर्णपान रु. २,५००/-

रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' नावाने संपादिकेच्या पत्त्यावर चेकने पाठवावी.

प्रकाशझोत

मिथुन किशोर खांबेटे

Stage - TV & Radio Artist,
R. J. - FM Radio
Actor / Singer / Comparer /
News Reader, V - TV,
Dubbing Artist /
Announcer - All India Radio



Marathe Pratishthan

सौ. मेधा मराठे, या श्री. वि. म. मराठे यांच्या पत्नी दुर्गम भागातील पाटबंधारे प्रकल्पांवरील गृहिणींच्या वाट्याला येणारे खडतर दिवस आनंदाने स्विकारले. अलोरे येथे असताना महिला मंडळाची स्थापना व सचिव म्हणून उल्लेखनी. कार्य, कविता लेख कथा लिहिण्याची आवड, आज विश्रामबाग येथे समवयस्क भगिनींच्या बरोबर धार्मिक ग्रंथ वाचन इ. बांगला देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात भारताने पुढाकार घेतला त्यावेळी आपल्या बऱ्याच सैनिकांना प्राण गमवावे लागले त्या सैनिकांच्या स्मृतीला मानवंदना सौ. मेधा मराठे यांच्या शब्दात.

भारत देश महान भारत देश महान
एक दिलाने गाऊ आपण
यश किर्तीचे गान ||धृ.||

स्वार्थी असती पाकिस्तानी | मानवतेला दिले झुगारुनी
आक्रंदती त्या आया बहिणी | बांधवांचेही गळे कापले
विसरुनी आपले भान ||१||

दीन दुबळ्याना पायी रगडले | सारे जग हे स्वस्थ झोपले
भारतियांचे मन ते द्रवले | प्राणपणाला लावून लढले
आपले शूर जवान ||२||

लढा पेटला स्वातंत्र्याचा | विजय जाहला जनसत्तेचा
विजय झाला इंदिराजींचा | जय बांगला, जय बांगला,
जय मुजीब रहेमान ||३||

दिनभर आपुले काम करु | घाम गाळूनी भाकर मिळवू
चतकोरातून नितकोर देऊ | शरणार्थींना केले आम्ही
सर्वस्वाचे दान ||४||

धारातीर्थी जवान पडले | किर्तीरुपे ते अमर जाहले
भाव पुष्प हे त्यांना वाहिले | मानाचा हा प्रणाम करुया
लवून आपली मान ||५||

एक दिलाने गाऊ आपण
यश किर्तीचे गान
जय जवान जय किसान

सौ. मेधा वि.मराठे(पृ.२३५) सांगली

## आवाहन

'मराठे प्रतिष्ठान हितगुज' च्या लेखनप्रिय सभासदांना, कुलबांधवांना,

हितगुजचा १०० वा अंक तुमच्या साहित्याने सजणार आहे. तुमच्या साहित्यामुळेच हितगुजचा १०० वा अंक प्रकाशित करण्याचा आमचा उत्साह द्विगुणित होतो. तेव्हा हितगुजचा १०० वा अंकासाठी आपल्या कथा, कविता, ललीत लेख, अनुभव, प्रवासवर्णन इत्यादी साहित्य आपल्याकडून अपेक्षित आहे.

साहित्य मजकुराविषयी सूचना :

१) साहित्य स्वतंत्र असावे तसेच इतरत्र प्रसिद्धीस दिलेले असू नये.
२) संकलन केलेले साहित्य मूळ संदर्भासह असावे.
३) मजकूर ओळी असलेल्या कागदावरच सुवाच्य अक्षरात लिहिलेला असावा.
४) कागदाच्या एकाच बाजूला लिहावे. व्यवस्थित समास असावा.
५) झेरॉक्स कॉपी पाठवू नयेत.
६) मजकूर फक्त १००० शब्दापर्यंतच असावा. तो पाठविण्याची शेवटची तारीख २० ऑक्टोबर २०१४ पर्यंत आहे.



Marathe Pratishthan

# आरोग्यं धनसंपदा - डोळा - निसर्गाची अमूल्य देणगी

डोळ्यांची जादू वर्णन करु गेल्यास मोठमोठे ग्रंथ देखील अपूरे ठरतात. यासाठीच सौदर्यामध्ये मोलाची भर टाकणारा हा अवयव म्हणूनच ओळखला जातो.

१) डोळे जर जडावल्यासारखे वाटत असतील किंवा थकवा, प्रदूषण यांमुळे चुरचुरत असतील तर ताबोडतोब कच्च्या बटाट्याची किंवा काकडीची कापं काढून (गोल चकत्या सालं काढून) ती डोळ्यावर ठेवावी.

२) डोळ्यात जर धुळींकण, कचरा गेले असेल तर लगेच डोळा धुवावा. डोळ्यावर पाण्याचे फवारे घ्यावेत किंवा स्वच्छ बशीत पाणी घेऊन त्यात १० ते १५ मिनिटे डोळ्यांची उघडछाप करावी.

३) मधूनमधून डोळ्यावर स्वच्छ कापडाच्या घड्या पाण्यात वा दुधात वा गुलाबजलात बुडवुन ठेवाव्या.

४) सारखं सारखं टिव्ही, संगणकावर बसून फार करु नये. अधूनमधून हाताच्या तळव्यांनी डोळे झाकून घ्या. अंधारात डोळ्यांना विश्रांती मिळते. त्यामुळे थकवा न जाणवता आराम पडेल. सारखे सूर्यकिरणांकडेही टक लावून बघू नका. उन्हात जातेवेळी डोक्यावर टोपी वा छत्री तसेच गॉगल लावावा. तसेच उन्हातून आल्यावर, झोपून उठल्यावर डोळे थंड पाण्याने स्वच्छ धुवा. काजळ किंवा इतर वस्तू डॉक्टरांच्या सल्ल्याने डोळ्याला लावा. अन्यथा त्याचे इतर परिणाम होण्याची शक्यता जास्त असते.

५) चष्मा असेल तर तो न विसरता वापरत जा.

६) डोळ्यांची जळजळ होत असेल तर सोललेल्या केळ्यांचे आतले साल वा गर डोळ्यांवर ठेवावे. रात्री एक ग्लासभर पाण्यात धणे भिजत टाकून दुसऱ्या दिवशी सकाळी त्या धण्याच्या पाण्याने डोळे धुवावे किंवा त्या पाण्यात कापडाचे छोटे तुकडे भिजवून त्या घड्या डोळ्यांवर ठेवाव्या.

७) आहारात पिष्टमय, प्रथिन, जीवनसत्वयुक्त पदार्थ असावेत. अति गोडपदार्थ सेवन करु नयेत.

८) हिरव्या पालेभाज्या, सातुचे पीठ, दूध, लोणी, डाळींब, गाजर, द्राक्षे, सफरचंद खावे, अति प्रमाणात दही डोळ्यांसाठी अपायकारक असते.

९) मैदानावर खेळ (उदा. कबड्डी, लंगडी, खोखो) जास्त प्रमाणात खेळावेत.

---

## वाचकांचा पत्रव्यवहार

संपादिका 'हितगुज' यांसी
स.न.वि.वि.

हितगुजच्या मार्च २०१४ अंक ९७ मध्ये आपण स्पर्धा घोषीत केली आहे. हितगुजच्या १०० व्या अंकाचे स्वरुप कसे असावे मी थोडा विचार केला कारण मी हितगुजचे अंक मनापासून वाचते.

मला वाटते हितगुजच्या अंकात जोक्स, विनोद, चुटके, हलके फुलके मनाला प्रसन्न करणारे साहित्य यायला हवे. सेलिब्रिटी, सिरियल्स मध्ये टि.व्हि. मालिकेत काम करणाऱ्या श्रृती मराठे, गायिका स्वरांगी मराठे ह्यांच्या मुलाखती १००व्या अंकात घ्याव्यात जशी ७५ व्या अंकात प्रिया मराठे हिची मुलाखत व फोटो आला होता.

रेसिपीजना् प्राधान्य द्यावे वेगवेगळ्या प्रांतातल्या निरनिराळ्या स्वादिष्ट पाककृती कशा बनवायच्या ते आम्हांस समजेल. खेळांना हितगुजच्या अंकात महत्व द्यावे क्रीडाविश्व किंवा क्रीडाजगत् असे सुंदर सुरु करावे त्याचप्रमाणे आरोग्या विषयी सहजपणे माहिती द्यावी अर्थमंथन सदर सुरु करुन त्यात मराठे परिवारातील अर्थतज्ञ जसे डॉ. गिरीश जाखोटिया, डॉ. अभिजीत फडणीस, C.A.चंद्रकांत मराठे, C.A. प्रभाकर मराठे, आकांक्षा कविता लिहिणारे C.A. मराठे, यांचे विचार मंथन करणारे लेख छापावेत. आध्यात्मिक, परमार्थावर पण कठीण नाही समजण्यास सोपे असे लेख छापावेत. मनाचे अनेक ज्ञानेश्वरी, हरिपाठ, गीता, भागवत, उपनिषदे, पुराणे यावर सोप्या भाषेत विश्लेषण करावे. व नियमित हितगुजमध्ये छापावे. १००व्या अंकात ज्ञानेश्वरी, संतसाहित्य यावर लेख अपेक्षित आहे. तो छापावा. अंक दर्जेदार काढावा. अंक वाचनीय काढावा. कथा कविता, व्यक्तीचित्रण, प्रवासवर्णन, मुलाखती हितगुजच्या १००व्या अंकात छापाव्यात.

हितगुजच्या १००व्या अंकासाठी मी स्वतः शुभेच्छा म्हणून जाहिरात देणार आहे.
मराठे प्रतिष्ठान कार्यकारिणीतील सर्व सभासदांना स.न.. कळावे,

आपल्या परिवारातील
कु. मधुरा प्रभाकर मराठे (पृ.१२०)



Marathe Pratishthan

# Jahangiri shorba

In the period from 1965-1985 many middle-eastern countries saw tremendous economic growth This growth was because of the oil boom. The rate of growth was dependent on oil reserves a county had. North Yemen was one of the countries with low key development. In those days, North Yemen with Sana'a as the capital city and South Yemen with Aden as the capital city, were two independent countries.

North Yemen was bounded by Red Sea in the west, Saudi Arabia in the north and South Yemen in east and south. The country was half the size of Maharashtra with population less than that of Mumbai.

Everyone knows about the seven wonders of the ancient world – but there is a monumental structure archeologists and historians like to call the eighth wonder of the world: the Great Marib Dam in the ancient Kingdom of Sheba in North Yemen. Yemenis proudly aver that it was the home of the beautiful Queen Bilquis of Sheba.

South Korean construction organizations were quite active in North Yemen.In 1982, a South Korean organization requested the Hindustan Constriction Co. Ltd. where I was working, to join it for construction of a road. My boss, who was too anxious not to miss any opportunity, instructed me and my colleague –one Mr. P. C. to rush to Sana'a. We got our visa and U.S.$ 600 for six day visit as pr Government Rules and left by the next flight reaching Sana'a on Friday morning. This was the beginning of 'whatever could go wrong went wrong'.

In those days, the only good hotel in Sana'a was Sheba managed by Taj. Most of the other hotels were third-rate. Room rent was U.S.$ 104 per day which was more than our daily allowance and we had no choice but to settle for a double room. Though it was a Friday – a holiday in the Arabian world -, we tried to contact the Koreans at Sana'a. The Korean who answered our call was their accountant. He told us that he was aware of our visit but no engineering officer was going to be available for the next three days because of extended weekend. Later on he called us and informed us that he had contacted the General Manager who had suggested that we should proceed to Al Hudaydah Port on the Red Sea and, meet the Project Manager on Monday, visit site and then return to Sana'a to meet him for final discussions. We requested him for a vehicle for proceeding to Al Hudaydah but he told us that road travel was not easy as Sana'a is at an elevation of about about 2,500 m.[8,000 ft] and Al Hudaydah was at sea level and was connected by a steep winding road and advised us to take a flight. Luckily Yemen Air office was open and we could make our booking for Sana'a - Al Hudaydah - Sana'a flights for U.S.$ 400.

All this meant that though we had expected the visit to be of three days, it would be a six day programme. The most distressing part was that between two of us we has U.S.$ 1,200 and we had to manage within this budget. In Yemen, taxi charges for travel between Airport and City were at a flat rate of U.S.$ 25. Our programme needed six transfers between Airport and City for U.S.$ 150. Hotel room would cost us U.S.$ 624 + taxes. We had already spent U.S.$ 400 on local Air Tickets and all this meant that for our food and local travel etc. we would have hardly any money left. Getting money from India was not possible due to Government regulations. We tried to contact some friends from the middle east but no one was available due to extended weekend. This was an impossible situation and we decided to approach the Koreans for money on loan. We contacted the accountant again and apprised him of the situation and told him that we were tying to contact our Mumbai office so that by Monday, they would get a request for advancing us U.S.$ 400. He told us that telephonic and telex communication between Yemen and outside world was not dependable and the message from Mumbai may not reach them by Monday. He however assured us that after his G.M returns to Sana'a, on Monday he would advance us the money.

All this situation was our own asking. Our boss forced us to rush without proper planning and without proper appointments. Had we sought prior appointments, we would have travelled with proper air tickets and would have finished our work in four days without any financial crisis.

Anyway, as a precaution, we decided to go on a drastic economy drive. Sana'a is at an elevation of about 2,500 m. [ 8,000 ft.]. The weather was very dry and we had to drink lot of water. On the first day, we drank 6 bottles of water costing U.S.$12. Our room boy, who was from Goa suggested that we should buy water bottles form the market at 30% of the hotel price. He told us that gulping down glasses of water would not quench thirs in Sana'a and we should sip water at short intervals. He also advised us to eat only at our hotel as outside restaurants were not only not clean but filthy with leftovers littered all around. . On the hotel menu, we located 'Jahangiri Shorba' which was a soup on a bed of rice. We picked up some buns from the market and for the first three days i.e. Friday, Saturday and Sunday we had this for lunch and dinner. Even today, the taste of "Jahangiri Shorba' is lingering in my mouth.

On Sunday evening, we left Sana'a and flew to Al Hudaydah – the second largest city of North Yemen and a port on the Red Sea. After clearing Hotel Taj Sheba bill on Sunday, we realized that the loan of U.S.$ 400 we had asked for would be enough to take us through. We therefore decided to switch over to normal food instead of our earlier staple diet of 'Jahangiri Shorba'.

On Monday, the Korean Project Manager picked us up from our hotel and took us round the project area which was about 60 km. from the city. That evening, we visited a beautiful sandy beach on the Red Sea

and collected some corals strewn on the beach and returned to the hotel.

On Tuesday morning the Project Manager paid us U.S.$ 400 as asked for by us. We flew back to Sana'a by an afternoon flight. We met the Korean G.M. for discussions regarding the quote required from us and works coming up in future. He wanted us to give him our quote and start negotiations right away. We expressed our inability since as per Indian regulations, we had to get our proposal and quote approved from the Government Authorities before submission to him. He then agreed to give us a time of 10 days. We thanked him profusely for the help.

We called on the Indian Charge d'Affaires on Wednesday. We apprised him of the insufficient foreign exchange released by the Government of India for visit to North Yemen and requested him to take up the matter with the Government of India. Instead, he advised us to take up the matter with the Government of India through the Federation of Indian Industries. We also requested him to collect information on upcoming tenders and transmit it to us by telex [ in those days e'mail was not existing]. He expressed his inability as he was short of staff. It was because of such unenthusiastic attitude that Indians had not been able to penetrate Yemeni market. Government officials visiting places abroad had no problems about meeting their expenses as their bills were taken care of, by the Indian Embassy.

Wednesday night, we took Yemen Air Flight to Mumbai from Sana'a Airport. We were still in for a last shock. We had to pay departure tax and we boarded the flight with about U.S.8 in our pocket, which was enough to buy a couple of drinks during the flight. When the flight took off we were greatly relieved.

Had the money available with us not been enough we would have been forced to postpone our departure. As per Yemen laws, any visitor staying in Yemen for more than six days was required to obtain an exit visa. We were leaving on the sixth day. Any postponement would have resulted in our requiring to get the exit visa on Thursday itself as Fridays are holidays in the Arabian World.

I had never travelled in such an unplanned manner till then and decided to make this Yemen visit as the first and last unplanned tour. Our flight to Mumbai had a stopover at Sharjah. All our co-passengers rushed out for duty-free shopping. We two were the only persons left in the aircraft.

One important thing we noticed in the Korean camp was that the officers and all other personnel right down to the level of a workman ate the same food prepared in a common kitchen. The kitchen had a dining hall in its two sides – one for the officers and the other for other personnel. As compared to our construction sites, the number of persons was much less. For the purpose of economy, for overseas contracts, the Koreans chose skilled workmen versed in at least two or better three trades. This way they could save on indirect costs of workmen and afford to pay higher wages. In those days, the Koreans were also venturing overseas to earn foreign exchange. In order to encourage personnel to work overseas, they were rewarded in the form of free land for farming and housing.

In one of the preceding paragraphs I have described as to how unhelpful our Embassy was. Why Koreans could succeed in contracts overseas was because of total support from their Government. Koreans had a firm belief that because of such supports, the contractors would better profits which would ultimately flow back to Korea in the form of foreign exchange. In those days, Indian contractors had to get their tenders approved from a Committee approved by the Reserve Bank and Exim Bank, obtain a back-up bid bond and then approach a final bid bond from a local overseas bank. In case of Koreans, the bid bond guarantee was given by the Korean Government itself.

One Korean contractor had a big project under construction in North Yemen. He sensed that his work would soon come to stop because of shortage of cement. To tide over the situation, Government of Korea dispatched shipload of cement. As a contrast to this, Indian contractors who were constructing bridges in the Middle East needed hundreds of tones of G.I.Pipes for Side Railing. Export of pipes from India was banned. In spite of representations of Indian contractors to make an exception, export was not permitted and ultimately all the pipes were obtained from Europe at almost double the price. Had the contractors used pipes from India, the extra cost that was paid to Germans would have resulted in increased profit and the money would have flowed back to India in the form of foreign exchange. Unfortunately, 'Babudom' of India was supreme. However, of late things have changed in India and decisions are based more on practical considerations that rule books.

Koreans are also very ingenious. Construction work for expansion of a port in North Yemen was to be completed in 18 month. The Koreans brought a ship full of construction plant, equipment and personnel. They took special permission from the port authorities to anchor the ship in the harbor. Instead of spending time and money on construction of residential colony and office complex, they operated from the ship and completed the work early and got bonus.

Since 1990, North Yemen and South Yemen have unified to form Republic of Yemen with Sana'a as the capital. In January 2009, the Saudi and Yemeni al-Qaeda branches merged to form Al-Qaeda in the Arabian Peninsula (AQAP). Al Qaeda in the Arabian Peninsula is based in Yemen, and many of its members are Saudi nationals who had been released on condition of good behaviour, but terrorist activities continue.

श्री. रमाकांत विद्वांस (पृ. ६२३)
३१, गुडविल अॅश्युरन्स सोसायटी, बीपीएल मोबाईल
सेंटरच्यामागे, मनमाला टँक रोड, माटुंगा (प.)
दूरध्वनी : ०२२-२४३०५२६०



Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

शनिवार दि. ३१ मे २०१४ संध्याकाळी ५ वा. मराठी प्रतिष्ठानची बैठक सुलभाताईंच्या निवासस्थानी माहीम येथे झाली.

बैठकीत अध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस, कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर दामोदर मराठे, कार्यवाह श्री. हेमंत अरुण मराठे, श्रीनिवास मराठे, श्री. शैलेन्द्र मराठे, सौ. प्रतिभा मराठे, श्रीमती सुलभाताई मराठे, डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे आणि गोव्याचे ज्येष्ठ कुलबांधव श्री. कालीदास बाळकृष्ण मराठे (शिक्षणतज्ञ) इ. उपस्थित होते.

अहवाल वाचन झाले. हितगुजच्या १०० व्या अंकाच्या प्रकाशन कार्यक्रमासाठी भाऊ मराठे यांनी मार्गदर्शन केले. श्री. प्रभाकर दामोदर मराठे यांनी आय-व्यय ताळेबंद सादर केला त्यावर चर्चा होऊन तो कार्यकारिणी ने संमत केला. वार्षीक सर्वसाधारण सभा कधी घ्यावी ते ठरविले जात होते. हॉल उपलब्ध झाला तर २ ऑगष्ट ला सभा होईल. श्रीनिवास मराठे सावरकर सभागृहाची चौकशी करुन त्याप्रमाणे हॉल बुक करतील असे ठरले.

८० जी मिळण्यासाठी काय करावे लागेल त्याविषयी विचार विनिमय झाला. आपले कुलबांधव चार्टड अकाऊंटंट श्री. आशुतोष दिवाकर विद्वांस यांचे बहुमोल सहकार्य प्रतिष्ठानला मिळणार आहे. श्री. कालीदास मराठे यांनी ही योग्य त्या सुचना करुन मार्गदर्शन केले.

स्वादिष्ट अल्पोपहार, चहापानाने सभेची सांगता झाली.

## पुढील दोन सभा

मराठे प्रतिष्ठान ची कार्यकारीणीची सभा दर महिन्याच्या चवथ्या शुक्रवारी दु. ४.०० वा. घेण्यात येते. या तिमाहीमध्ये ता. २७/६/१४ रोजी श्रीमती सुलभाताई मराठे यांचे घरी सभा घेण्यात आली. सदर सभेमध्ये पारीत झालेले ठराव व पुढीलप्रमाणे घटना दुरुस्तीसाठी विशेष सर्वसाधारण घेणे आवश्यक असल्याने ता. २४/८/१४ रोजी सकाळी ९.३० वा. सदर विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले. सन २०१३-२०१४ सालासाठीची ३२वी वार्षिक सर्वसाधारण सभा ३/८/१४ रोजी ठरविण्यात आली होती, मात्र काही तांत्रिक कारणास्तव सदर सभा ३/८/१४ रोजी घेण्याऐवजी २४/८/१४ रोजी सकाळी १०.३० वा. घेण्याचे ठरविण्यात आले.

पुढील सभा ता. २५/७/१४ रोजी श्रीमती सुलभाताई मराठे यांचे घरी घेण्यात आली. सदर सभेमध्ये हितगुजच्या १०० व्या अंकासाठी म. प्र. चे अध्यक्ष (श्री. रमाकांत विद्वांस यांनी रु. १,०००/-, श्री. सि. गो. खांबेटे यांनी रु. ५००/- आणि श्री. सुरेंद्रनाथ मराठे यांनी रु. १००१/- चे धनादेश दिले. कार्यकारीणीने त्यांना धन्यवाद दिले. म. प्र. चे कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर मराठे यांना कामाच्या व्यापामुळे वेळ कमी पडत असल्याने सभेमध्ये चर्चा होऊन श्री. श्रीनिवास मराठे, दादर, यांची कोषाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. २४/८/१४ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर ते आपला कार्यभार स्वीकारतील.

यानंतर कुलबांधवांची पत्रे वाचून त्यावर निर्णय घेण्यात आले. इचलकरंजी येथील कुमार व्यंकटेश संजय मराठे यांचा शैक्षणिक मदतीसाठी आलेल्या अर्जावर विचार करुन रु. २५०००/- परतफेडीची मदत मंजूर करण्यात आली. यानंतर चहापानानंतर सभा संपविण्यात आली.

### आजोबांचे अभिनंदन !

आपले कुलबांधव श्री. किशोर खांबेटे (पृ.६९८) राहणार अहमदाबाद त्यांचे सुपुत्र श्री. मिथुन, यांना दि. १३ जून २०१४ ला पुत्ररत्न झाले बाळाचे नांव 'विश्वराज' ठेवले. ही १२ वी पिढी आहे. श्री. किशोर खांबेटे आजोबा झाल्याबद्दल म. प्र. द्वारा अभिनंदन. चिमुकल्या बाळाला - 'विश्वराजला' उत्तोमत्तोम शुभाशिर्वाद!

Marathe Pratishthan

# द्वितीय वर्ष पुण्यस्मरण



**आठवणी निशीदिनी सोबत असती तरी**
**कृपाकटाक्ष तुझा राहो आम्हांवरी**

श्रीपाद नारायण मराठे, बेळगांव
सौ. जयश्री (गौरी) सदाशिव परांजपे, गारगोटी
सौ. वंदना (प्रियंका) प्रकाश कुलकर्णी, कोल्हापूर
कै. सौ. सुधा श्रीपाद मराठे (पृ.५३८)
टिळकवाडी, बेळगांव

निर्वाण तिथी : भाद्रपद वद्य सप्तमी तिथीनुसार
यंदा ता. १६-०९-२०१४

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. सौ. सुधा श्रीपाद मराठे
यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## माहिती पाठवा

हितगुजच्या १०० व्या अंकासाठी मराठे परिवारातील कलाकार, गायक, वादक, नर्तक, अभिनय-नट, चित्रकार, लेखक, साहित्यिक, विचारवंत, खेळाडू, उद्योजक, राजकारण इ. क्षेत्रातील कार्यकरणारे कुलबांधवांची यादी प्रकाशित करायची आहे. तेव्हा थोडक्यात आपल्या कार्याविषयी माहिती, पासपोर्ट आकाराचा फोटो आणि आपला पत्ता व दुरध्वनी कळवावा लवकरात लवकर म्हणजे दि. २० ऑक्टोबर २०१४ च्या आत माहिती संपादिकेच्या पत्त्यावर किंवा ईमेलने पाठवावी हि विनंती.

If undelivered,
please return to


**संपादिका : 'हितगुज'**
**डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे**
**८/१३, सहकार नगर,**
**वडाळा, मुंबई ३१.**



त्रैमासिक हितगुज हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, अप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५. या न्यासाचे मुखपत्र असुन फक्त सभासदांसाठी वितरित होते. पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ, सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई -३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल:prabhakar_marathe@yahoo.com ई-मेल : (१) sitaram_khambete@yahoo.co.in (२) marathepariwar@yahoo.co.in वेबसाईट : www.marathepratishthan.org


Marathe Pratishthan